सोलापूर


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १५३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या

## दिव्यांग बांधवांना थकीत मानधन व स्वस्त धान्य उपलब्ध करून द्या - संभाजी ब्रिगेडचे मुख्यमंत्र्यांना निवेदन



**अंबाजोगाई :** महाराष्ट्रात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी तसेच दिव्यांग बांधवांना थकीत मानधन व स्वस्त धान्य उपलब्ध करून द्यावे यासह विविध मागण्यांचे दोन स्वतंत्र निवेदन संभाजी ब्रिगेडच्या वतीने मंगळवारी मुख्यमंत्री, महसूल मंत्री यांना उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत देण्यात आले.

**संभाजी ब्रिगेडच्या वतीने अध्यक्ष ॲड.मनोज आखरे व महासचिव सौरभ खेडेकर यांच्या नेतृत्वात प्रविण उत्तमराव ठोंबरे यांनी मंगळवार, दिनांक १५ सप्टेंबर २०२६ रोजी देवेंद्रजी फडणवीस (मुख्यमंत्री), चंद्रशेखर बावनकुळे (महसूल मंत्री) यांना उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत दिलेल्या दोन स्वतंत्र निवेदनात नमूद केले आहे की, सध्याच्या परिस्थितीत पावसाने पाठ फिरवल्याने मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील खरीप हंगाम गंभीर संकटात सापडला असून, तातडीच्या उपाययोजना करणे अत्यावश्यक झाले आहे. सध्या मराठवाड्यासह विदर्भ व उत्तर महाराष्ट्रातील शेतीची परिस्थिती अत्यंत भयावह असून कोरड्या दुष्काळसदृश्य बनली आहे. तरी मा.मुख्यमंत्री महोदयांनी वरील विभागातील परिस्थितीचा आढावा घेऊन महाराष्ट्रात कोरडा दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत जाहीर करून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, ही नम्र विनंती. महोदय, मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात पावसाची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. संपूर्ण खरीप हंगामात पावसाने सातत्याने ताण दिल्यामुळे जवळपास सर्वच खरीप पिके करपू लागली आहेत. त्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. अनेक शेतकऱ्यांनी खरीप पेरणीसाठी बँका, विविध पतपुरवठा संस्था तसेच खासगी सावकारांकडून कर्ज घेतले आहे. मात्र, पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावरच पाऊस न झाल्याने या शेतकऱ्यांसमोर कर्ज फेडण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झौला आहे. उत्पादनच हाती येण्याची शक्यता कमी झाल्याने शेतकऱ्यांचे संपूर्ण आर्थिक गुणित कोलमडण्याची भीती आहे. त्यामुळे केवळ पावसाची प्रतीक्षा करण्याऐवजी शासनाने परिस्थितीचे तातडीने मूल्यांकन करून मदतीचा निर्णय घ्यावा, अशी आमची मागणी आहे. आमच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे :** १) कोरडा दुष्काळ जाहीर करून सवलती लागू कराव्यात सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करावा. दुष्काळ जाहीर झाल्यानंतर शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सर्व शासकीय सवलती आणि मदतीचा मार्ग मोकळा करून त्यांना आधार द्यावा., २) तातडीची आर्थिक मदत व रब्बीचे नियोजन खरीप पिकांचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी आर्थिक मदत, आगामी रब्बी हंगामाचे नियोजन, बियाणे उपलब्धता, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था यावर तातडीने निर्णय घ्यावा., ३) शैक्षणिक दिलासा : शेतीच्या नुकसानीकडे लक्ष देताना कष्टकरी, शेतकऱ्यांच्या मुलांचे शैक्षणिक शुल्क व स्पर्धा परीक्षा शुल्क पूर्णतः माफ करून दिलासा द्यावा., ४) पाणी टंचाईचे पूर्वनियोजन पावसाअभावी तलाव, विहिरी आणि इतर जलस्रोतांमधील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे पुढील काळात पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. यासाठी टँकरने पाणीपुरवठा आणि चारा छावण्या यांचे पूर्वनियोजन करणे आवश्यक आहे., ५) छत्रपती संभाजीनगर येथे विशेष मंत्रिमंडळ बैठक : मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त येत्या दि.१७ सप्टेंबर रोजी आपल्या हस्ते छत्रपती संभाजीनगर येथे ध्वजारोहणाचा शासकीय कार्यक्रम होणार आहे. याच पार्श्वभूमीवर त्याच दिवशी छत्रपती संभाजीनगर येथे मंत्रिमंडळाची विशेष बैठक घेऊन, मराठवाड्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीचा सर्वंकष आढावा घेऊन मदतीचे विशेष पॅकेज जाहीर करावे, अशी आमची आग्रही मागणी आहे. तरी आपण वरील विषयांचे गांभीर्य लक्षात घेऊन कष्टकरी शेतकऱ्यांना न्याय द्यावा व शेतकरी सुरक्षित ठेवावा, तसेच एप्रिल ते सप्टेंबर २०२६ पर्यंतचा दिव्यांगांना शासनामार्फत मिळणारे मानधन अजूनही मिळालेले नाही. त्यामुळे दिव्यांग बांधव हे अत्यंत हालाकीचे जीवन जगत आहेत. तरी शासनाने दिव्यांगांचा विचार करून त्यांना मानधन द्यावे, संजय गांधी योजने मार्फत दिव्यांगांचे मानधन प्रत्येक महिन्याला मिळावे, यावर्षी ८ मे २०२६ रोजी पाटोदा (ममदापूर) गावात शासन आपल्या दारी हा कार्यक्रम झाला होता. त्या कार्यक्रमामध्ये दिव्यांगांनी आम्हाला मानधन मिळत नाही. याबाबत पुर्वकल्पना देवून (तक्रार अर्ज दिला होता) परंतु, अद्याप ही दिव्यांगांना न्याय मिळालेला नाही. म्हणून आम्ही मंगळवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजी उपजिल्हाधिकारी कार्यालय, अंबाजोगाई या ठिकाणी उपोषण करणार आहोत. अशा मागण्यां दोन वेगवेगळ्या निवेदनातून करण्यात आलेल्या आहेत. निवेदन देताना संभाजी ब्रिगेडचे विभागीय सचिव प्रवीण उत्तमराव ठोंबरे, संभाजी ब्रिगेड महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सुनंदा लोखंडे, रामकिसन मस्के, ॲड.प्रशांत पवार, सुरेश बंडू लोखंडे, अंकुश ढोबळे, दत्ता इंगळे, चंद्रकांत डिरंगे, उदय देशमुख, बाबु जोगदंड, मदिना अत्तार, अनंत फेरे, भागवत इंगळे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## पदवीपेक्षा ज्ञान महत्त्वाचे; तरुणांनी आपली क्षमता ओळखावी

### द्वितीय पुष्प गुंफताना डॉ. ललित अधाने यांचे प्रतिपादन




**माजलगाव :** माणसाची ओळख केवळ पदवीमुळे होत नाही तर त्याच्या ज्ञानामुळे होते. तारुण्य हे वयावर ठरत नसून मानसिकतेवर ठरते. वास्तवाचे भान असणारा आणि सकारात्मक विचार करणारा तरुणच खऱ्या अर्थाने समाजाच्या परिवर्तनात योगदान देऊ शकतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी व साहित्यिक प्रा. डॉ. ललित अधाने यांनी केले. सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आयोजित सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेच्या द्वितीय पुष्पात डॉ. आधाने प्रमुखमार्गदर्शक म्हणून उपस्थित होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अभय सोळुंके होते.यावेळी उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, मराठी विभाग प्रमुख डॉ. भाऊसाहेब राठोड, पर्यवेक्षक महादेव अलझेंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढं बोलताना डॉ. अधाने म्हणाले की, आज गुणवत्ता असूनही अनेक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत. शासनकर्त्यांची अनास्था, बेरोजगारी आणि भवितव्याची चिंता यामुळे तरुणांच्या मनात खदखद निर्माण झाली आहे. या अस्वस्थतेला योग्य दिशा देणे ही समाजाची जबाबदारी आहे. प्रत्येक तरुणाने स्वतःच्या क्षमता ओळखून त्यांचा योग्य उपयोग केला पाहिजे.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. अभय सोळुंके म्हणाले की, तरुणांनी भविष्याचा वेध घेऊन कालानुरूप कौशल्य आत्मसात करावीत व सतत सकारात्मक दृष्टिकोन अंगिकारावा.

## दर्जेदार सेवा, पारदर्शक कारभारामुळे योगेश्वरी मल्टीस्टेटची प्रगतीकडे वाटचाल - रिकबचंद सोळंकी



**अंबाजोगाई :** महाराष्ट्र व कर्नाटक मधील ग्राहक व सभासदांच्या विश्वास व त्यांच्या पाठबळावरच अल्पावधीतच योगेश्वरी मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडिट सोसायटीने दर्जेदार सेवा देवून, आणि पारदर्शक कारभार करून प्रगतीकडे वाटचाल सुरू ठेवली असल्याचे चेअरमन चेअरमन रिकबचंद सोळंकी यांनी सांगितले. ते वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलत होते. ही सभा रविवारी आयोजित करण्यात आली होती. यावेळी कर्ज घेऊन ते मुदतीत परतफेड करणाऱ्या सभासद खातेदारांचा उत्कृष्ट ग्राहक म्हणून सन्मान करण्यात आला. तसेच उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा ही सत्कार करण्यात आला.

येथील आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी तर सभेच्या अध्यक्षस्थानी चेअरमन रिकबचंद बालचंदजी सोळंकी यांच्यासह व्यासपीठावर व्हाईस चेअरमन शेख अन्वर शेख वली हसन, तसेच संचालक सुधाकर हरिश्चंद्र टेकाळे, ॲड.अनिल संभाजीराव लोमटे, विलास सिद्राम जाधव, अप्पासाहेब त्रिंबकअप्पा संकाये, ॲड.विलास शिवाजीराव लोखंडे, भागवत रामकृष्ण मसने, शेख मुख्तार फकीर अहमद, श्रीमती आशालता विश्वजित वांजरखेडकर, सौ.मंदाकिनी बाजीराव खडके, कांतीलाल नंदलाल शर्मा, सचिन लक्ष्मीकांत बजाज, मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष गोरोबा ढगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## स्वरांग संगीत विद्यालयाचे माजलगावच्या संगीत स्पर्धेत सतत तिसऱ्या वर्षीही वर्चस्व




**बीड(प्रतिनिधी) :** पं.विष्णू दिगंबर पलुस्कर स्मृतीनिमित्त रसिक मंडळ , माजलगावच्या वतीने गेली 36 वर्षापासून सातत्याने आयोजित मराठवाडा स्तरीय सुगम-नाट्यगीत गायन स्पर्धेत यावर्षीही स्वरांग संगीत विद्यालय, बीडने सर्वाधिक पाच बक्षीसे पटकावली असून विजयाची हॅट्रिक केली आहे विशेष म्हणजे सलग तीन वर्षे स्वरांग विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम पारितोषिक पटकावले आहे.

यावर्षी माजलगाव येथे दि 13 सप्टेंबर रोजी झालेल्या स्पर्धेत स्वरांग विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या गटात जान्हवी देशपांडे ( प्रथम पारितोषिक ) अर्जुन महानोर (चतुर्थ पारितोषिक ) तर लहान गटात देव मुळे (द्वितीय पारितोषिक) स्वराली साळुंके (चतुर्थ पारितोषिक) आणि सिद्धी पाटील हीस विशेष पारितोषिक मिळाले.विद्यार्थी कलावंतांच्या या यशाबद्दल डॉ. सौ. दिपाताई क्षीरसागर, डॉ. संजय पाटील देवळाणकर, ज्येष्ठ पत्रकार श्री .महेश वाघमारे , श्री. प्रशांत सुलाखे ताल साधना म्युझिक सर्कलचे संचालक श्री. प्रकाश मानुरकर ,श्री. अमर डागा, देव संस्कृत क्लासेसचे संचालक श्री. दीपक मुळे, श्री वसुदेव काजळे श्री .नरहरी दळे ,श्री .गोविंद लोळगे ,स्वरांग संगीत विद्यालयाचे संचालक श्री .नामदेव साळुंके यांनी कौतुक करून अभिनंदन केले आहे.या कलावंतांना स्पर्धेत तबल्यावर श्री. बालाजी मानगीरे ,संवादिनीवर श्री. नामदेव साळुंके आणि श्री. वसुदेव काजळे सर यांनी साथ दिली . पारितोषिक समारंभास अध्यक्ष म्हणून श्री. देवेंद्र कुलकर्णी ( उपाध्यक्ष गांधर्व महाविद्यालय ,मुंबई) लातूर , तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिध्द हृदयरोग तज्ञ डॉ. राधाकिशन डाके यांची प्रमुख उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरता रसिक मंडळ माजलगाच्या सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीचा जामीन अर्ज फेटाळला

**केज (प्रतिनिधी) :** युसुफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या खुनाच्या गंभीर गुन्ह्यातील आरोपी मंगेश भारत माने याने दाखल केलेला नियमित जामीन अर्ज मा. अपर सत्र न्यायाधीश, केज यांनी फेटाळून लावला आहे. सदर प्रकरणात मयत ख़ुशालराम ठोंबरे यांच्या खुनाप्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ च्या कलम १०३(१) अन्वये गुन्हा दाखल आहे. आरोपीने लाकडी काठीने मयताच्या पाठीवर व छातीवर जबर मारहाण करून हत्या केल्याचा गंभीर आरोप आहे. या जामीन अर्जाच्या सुनावणीदरम्यान *सरकारी अभियोक्ता ॲड. आर. पी. उदार* यांनी सरकार पक्षातर्फे कामकाज पाहिले, तर फिर्यादी बालाजी खुशालराम ठोंबरे यांच्यातर्फे *ॲड. मनीषा गडकर (कुपकर पाटील)* यांनी बाजू मांडली. ॲड. मनीषा गडकर आणि सरकारी अभियोक्ता ॲड. उदार यांनी न्यायालयात सांगितेले की, "हा गुन्हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा असून प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब आणि शवविच्छेदन (Post Mortem) अहवाल आरोपीच्या विरोधात भक्कम पुरावा ठरत आहेत. आरोपीला जामिनावर मुक्त केल्यास तो साक्षीदारांवर दबाव आणू शकतो किंवा धमकावू शकतो." सरकारी अभियोक्ता ॲड. आर. पी. उदार आणि ॲड. मनीषा गडकर कुपकर यांचा हा भक्कम व परिणामकारक युक्तीवाद तसेच प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. अपर सत्र न्यायाधीश (केज) यांनी आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर केला. अँड मनीषा कुपकर गडकर यांना अँड.शाम देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले.



## सेवा संकल्प अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी भाजप बीड जिल्हा सज्ज!




भारतीय जनता पार्टी बीड जिल्हाच्या वतीने आयोजित जिल्हा बैठकीसह सेवा संकल्प अभियान कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

यावेळी सेवा संकल्प अभियान महाराष्ट्र सहसंयोजक श्री किरण पाटील भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख माजी राज्यमंत्री बदामराव पंडीत बीड जिल्हा भाजपा पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीदरम्यान सेवा संकल्प अभियानाची उद्दिष्टे, विविध उपक्रम आणि त्याचे प्रभावी नियोजन याबाबत श्री किरण पाटील यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत सेवा, विकास आणि जनकल्याणकारी उपक्रम पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले.

जिल्हाध्यक्ष श्री शंकर देशमुख यांनी लोकनेत्या ना.पंकजाताई मुंडे बीड जिल्हा प्रभारी तथा प्रदेश सरचिटणीस श्री सुनीलजी राणे खा.प्रितमताई मुंडे यांचे नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात सेवा संकल्प अभियान मोठ्या ताकदीने कार्यकर्त्यांचे सहकार्याने करणार असल्याचे सांगुन दि.१७ सप्टेंबर रोजी बीड जिल्ह्यातील सर्व रेल्वे स्थानकांवर आशीर्वादाचा दिवा लावणार असल्याचे सांगितले. याप्रसंगी बदामराव पंडीत संजय आंधळे रामदास बडे अजय सवई यांनी मार्गदर्शन केले

सेवा हेच संस्कार, संघटन हीच शक्ती आणि विकसित भारत हेच आपले ध्येय!

यावेळी नवनाथ शिराळे, रामदास बडे, शिवाजी आप्पा मुंडे, गणेश लांडे, देविदास नागरगोजे, कमलाकर कोपले, मीराताई गांधले, संजय आंधळे, हिंदुलाल काकडे, डॉ. अभय वणवे, अजय सवाई, लक्ष्मण जाधव, शांतिनाथ डोरले, भाग्यश्री ढाकणे, ओमप्रकाश गिरी, बाळासाहेब चोले, अशोक लोढा, मनोज पाटील, अशोक रसाळ, संदीप काचगुडे, शिवराज जाधव, अमोल वडतिले, नागेश तांबारे, दत्तप्रसाद जाधव, राजू शहाणे, ईश्वर पवार, प्रमोद रामदासी, गोकुळ कदम,मनोज गुंड, महादेव नागरगोजे, केशव बडे, भालचंद्र कुलकर्णी, शरद बडगे, ईश्वर बिक्कड यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## सावरकर महाविद्यालयात जागतिक ओझोन दिना निमित्त डॉ.येडे यांचे व्याख्यान संपन्न

बीड (प्रतिनिधी) येथील स्वा. सावरकर महाविद्यालयामध्ये 16 सप्टेंबर जागतिक ओझोन दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयातील भूगोल विभाग व हरित परिसर समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 16 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी 10.30 वाजता आंतरराष्ट्रीय ओझोन दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. सुहास मोराळे तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून श्री कालिकादेवी महाविद्यालय शिरूर कासार येथील भूगोल विभागाचे प्रो. डॉ. गौतम येडे उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे प्रो. डॉ. गौतम येडे यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये वातावरणातील ओझोन या वायूच्या नाशामुळे होणाऱ्या दुष्परिणामांचा आढावा घेऊन ओझोन वायू संरक्षणासाठी प्रत्येकाची व्यक्तिगत भूमिका काय असली पाहिजे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले, तर अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रो.डॉ.सुहास मोराळे यांनी प्रत्येकाने पर्यावरण पूरक दैनंदिनी अवलंबण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ.रमेश खंडागळे, भूगोल विभाग प्रमुख डॉ. अशोक डोके, भूगोल विभागाचे प्रा. डॉ.जोगेंद्र गायकवाड उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. डोके यांनी केले.

## भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रामटेक निवासस्थानी बाप्पाचे घेतले दर्शन

मुंबई दि. १६ --- भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अन्य नेत्यांनी आज रामटेक निवासस्थानी येऊन गणपती बाप्पाचे मनोभावे दर्शन घेतले. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सर्व मान्यवर नेत्यांचे हृदयपूर्वक स्वागत केले. दरवर्षी परंपरेनुसार ना. पंकजाताई मुंडे यांच्या रामटेक निवासस्थानी गेल्या सोमवारी विधीवत पूजनाने व प्रचंड उत्साहात श्री ची प्रतिष्ठापना करण्यात आली. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन आज मुंबई दौऱ्यावर होते, त्यांनी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकाळी रामटेक निवासस्थानी येऊन बाप्पाचे मनोभावे दर्शन घेतले. तत्पूर्वी निवासस्थानी आगमन होताच ना. पंकजाताई मुंडे यांनी नितीन नबीन व फडणवीस यांचे औक्षण करून स्वागत केले. दर्शनानंतर त्यांचा सिध्दिविनायकाची सुंदर व आकर्षक मूर्ती भेट देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी उपस्थित भाजपचे राष्ट्रीय सह संघटनमंत्री शिव प्रकाशजी, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा आदींचा ना. पंकजाताई मुंडे यांनी स्वागत व सत्कार केला. राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी आज माझ्या निवासस्थानी भेट देऊन बाप्पाचे दर्शन घेतले याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांनी आनंद व्यक्त केला. युवा मोर्चात काम करताना नबीन यांच्या संघटन कौशल्याचा आपल्याला अनुभव आहे, आज ते राष्ट्रीय अध्यक्ष पदापर्यंत पोहोचले आहेत, ही निश्चितच माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे असं सांगत त्यांनी त्यांच्या भविष्यातील प्रवासाला शुभेच्छा व्यक्त केल्या.

## बीडवर दुष्काळाचे भीषण सावट, तातडीने दुष्काळ जाहीर करा !, आ. नमिता मुंदडा यांची आक्रमक मागणी

**अंबाजोगाई :** अंबाजोगाईत पावसाने ओढ दिल्याने बीड जिल्ह्यात निर्माण झालेली भीषण पाणीटंचाई आणि करपलेल्या पिकांमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. या भयावह परिस्थितीची दखल घेत केजच्या आमदार नमिता मुंदडा यांनी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना शासनाकडे अहवाल सादर करून तातडीने दुष्काळ जाहीर करण्याबाबत अहवाल द्यावा अशी आक्रमक मागणी पत्राद्वारे केली आहे. दुष्काळ संनियंत्रण समितीची तातडीने बैठक बोलावून शासनाकडे अहवाल सादर न केल्यास प्रशासकीय दिरंगाईमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होईल, असा परखड इशारा त्यांनी या निवेदनातून दिला आहे.

जिल्ह्यात यंदा पावसाचे प्रमाण अत्यंत अल्प असून पावसातील दीर्घ खंडामुळे खरिपातील कापूस, सोयाबीन, मूग, उडीद आणि तूर यांसारखी पिके करपून गेली आहेत. दुसरीकडे ऊस पिकावर पाणी नसल्याने रोगराई पसरली असून अनेक ठिकाणी कृषी वीज जोडण्या खंडित करण्यात आल्याने शेतकऱ्यांसमोरील संकटे अधिकच गडद झाली आहेत. धरणे, नद्या आणि तलावांमध्ये पाणीसाठा शिल्लक नसल्याने अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना वणवण भटकावे लागत आहे. जिल्ह्यात सुमारे आठ ते दहा लाख पशु धनासाठी चारा व पाणी उपलब्ध नसल्याने ग्रामीण अर्थव्यवस्था मोठ्या संकटात सापडली असल्याची भीषण वास्तवता नमिता मुंदडा यांनी मांडली आहे.शासनाच्या निकषांनुसार सलग तीन ते चार आठवड्यांचा पावसाचा खंड आणि सरासरीपेक्षा ५० टक्क्यांहून कमी पाऊस यामुळे जिल्ह्यात ट्रिगर १ लागू होण्यासाठी आवश्यक असणारे सर्व निकष पूर्ण झाले आहेत. त्यामुळे पिकांचे झालेले नुकसान आणि पाणीटंचाई लक्षात घेता शासनाने ट्रिगर-२ अंतर्गत जलस्रोतांची पातळी, रोजगार मागणी, आणि ग्रामीण जनतेवरील आर्थिक परिणामांचे तातडीने सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. महसूल, कृषी, जलसंपदा आणि पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी करून ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या गावांची नोंद घ्यावी, अशी स्पष्ट मागणी या पत्रात करण्यात आली आहे.

# रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईच्या नेशन बिल्डर अवॉर्डने १० गुणवंत शिक्षक सन्मानित




**अंबाजोगाई :** विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करून संस्कार, मूल्ये आणि सामाजिक बांधिलकीची पेरणी करणारे शिक्षक हेच खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्मितीचे शिल्पकार आहेत. शिक्षकांच्या या कार्याचा गौरव करण्यासाठी रविवारी एका विशेष समारंभात रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईच्या वतीने नेशन बिल्डर अवॉर्डने १० गुणवंत शिक्षकांना सन्मानित करण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईच्या वतीने ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त नवकेशर डान्स ॲण्ड ड्रामा अकॅडमी, डॉ.मुळे हॉस्पिटल समोर, रिंग रोड अंबाजोगाई येथे नेशन बिल्डर अवार्ड पुरस्कार वितरण सोहळा नुकताच आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रोजेक्ट डायरेक्टर माजी प्राचार्य डी.एच.थोरात हे होते, तर व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून माजी प्राचार्य डॉ.डी.ए.कांबळे, रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे अध्यक्ष भिमाशंकर शिंदे, सचिव सुनील व्यवहारे यांची उपस्थिती होती. यावेळी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १० गुणवंत शिक्षकांचा नेशन बिल्डर अवॉर्ड देवून सन्मान करण्यात आला. सन्मानाचे स्वरूप सन्मानपत्र, फेटा, शाल व पुष्प असे होते. नेशन बिल्डर अवॉर्ड प्राप्त गुणवंत शिक्षकांत दत्ता माणिकराव देवकते, प्रदीप नानाभाऊ चव्हाण, हेमंत धानोरकर, रमेश सोनटक्के, बाबुराव जोगदंड, सौ.मीना गणेश तौर-अंबुरे, प्रेमल खंडागळे, मेराज काझी, वर्षा राजाराम सावंत, जया किसन इगे या १० गुणवंत शिक्षकांचा समावेश आहे. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण झाले. पारदर्शक निवड प्रक्रियेतून या शिक्षकांची निवड करण्यात आली. रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई हा केवळ पुरस्कारांपुरता मर्यादित नसून महिला सक्षमीकरण, मुलींचे शिक्षण आणि विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबवित असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. शिक्षकांचा सन्मान म्हणजे राष्ट्राच्या भविष्याचा सन्मान असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे सामाजिक योगदान, वंचित घटकांना दिले. हा क्लब सामाजिक बदलासाठी सातत्याने कार्यरत आहे. विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन ही या क्लबची मुख्य ओळख बनली आहे. तळागाळातील घटकांना बळ देण्याचे कार्य अविरत सुरू असते. असे विचार यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. उच्चपदस्थ व्यक्तींनाही घडवितो तो शिक्षक. मग तो खेळाडूंना, अधिकाऱ्यांना, शास्त्रज्ञांना, पोलिसांना, वाहनचालकांना, नर्तकांना, गायकांना अशा विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींना घडवणारा शिक्षक हा खरोखरच नेशन बिल्डरच असतो हे रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईने समाजाला दाखवून दिले. यावेळी सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांनी सत्काराला उत्तर म्हणून आपले समायोचित मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी माजी प्राचार्य डॉ.डी.ए.कांबळे व माजी प्राचार्य डी.एच.थोरात यांनी उपस्थितांना मौलिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अनंत कांबळे यांनी केले. तर प्रास्ताविक अध्यक्ष भिमाशंकर शिंदे यांनी करून उपस्थितांचे आभार सचिव सुनील व्यवहारे यांनी मानले. कार्यक्रमाची सुरूवात दिवंगत राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. व सांगता सामुहिक राष्ट्रगीताने झाली. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रोटरी सदस्य ॲड.कल्याण लोमटे, श्रीनिवास पवार, अभियंता विश्वनाथ लहाने, आनंद कर्नावट, वाजेद काझी, जगदीश जाजू, शरद देडे आदींनी पुढाकार घेतला होता.

# इफ्कोचे अध्यक्ष दिलीप सांघाणी यांची 'आयसीए'च्या ग्लोबल बोर्डावर निवड




तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय सहकार क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण घडामोडीत इफ्कोचे अध्यक्ष दिलीप सांघाणी यांची आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडीच्या (आयसीए) ग्लोबल बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवर 'ॲट-लार्ज डायरेक्टर' म्हणून निवड झाली. पनामा येथे झालेल्या आयसीएच्या महासभेदरम्यान झालेल्या निवडणुकीत ही निवड करण्यात आली.

सांघाणी यांच्या विजयाची घोषणा होताच पनामा येथे उपस्थित भारतीय सहकारी प्रतिनिधी मंडळाने जल्लोष केला. प्रतिनिधींनी 'भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम्'च्या घोषणा देत आनंद व्यक्त केला.

सांघाणी हे अनेक दशकांपासून सहकार क्षेत्रात कार्यरत असून, शेतकरी सक्षमीकरण, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास आणि सहकारी संस्थांच्या बळकटीकरणासाठी त्यांनी योगदान दिले आहे. ते इफ्को तसेच गुजरात को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशनचे अध्यक्ष आहेत.

आयसीएच्या ग्लोबल बोर्डावर भारताचे प्रतिनिधित्व झाल्याने जागतिक सहकार क्षेत्रात भारतीय सहकार चळवळीचा आवाज अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे. 'सहकारातून समृद्धी' ही संकल्पना जागतिक स्तरावर पुढे नेण्यासाठी ही निवड महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

# णमोकार सेवेचे मनोज छाबडा यांना महाराष्ट्र भुषण पुरस्कार प्रदान



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** नाशिक येथील समारंभात आनंदी युनिव्हर्स फाउंडेशनतर्फे महाराष्ट्रातील विविध सामाजिक, उद्योग, सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असणारे अशा नामांकित व्यतींना महाराष्ट्र भुषण पुरस्काराने गौरविण्यात आले. यामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिध्द सामाजिक कार्यकर्ते णमोकार एसएमएस सेवेचे संचालक व सकल जैन समाजाचे कार्यकर्ते मनोज छाबडा यांचा महाराष्ट्र भुषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. प्रसिध्द मराठी सिनेअभिनेत्री पुजा मालोदे, आनंदी युनिव्हर्स फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गणेश विटेकर व प्रिया छाबडा यांच्या उपस्थितीत गुरूदक्षिणा सभागृह गोखले एज्युकेशन सोयायटी येथे कार्यक्रम संपन्न झाला.

मनोज छाबडा मागील १५ वर्षापासून णमोकार एस एम एस सेवेच्या माध्यमातून धार्मिक, सामाजिक माहिती संपूर्ण महाराष्टात सोशल मिडियाच्या माध्यमातून समाजामध्ये निशुल्क देण्याचे काम करतात. तसेच सकल जैन अंतर्गत भगवान महावीर चौक येथील महावीर स्तंभाची मागील ६ वर्षापासून स्वच्छता अभियान राबवितात. आतापर्यंत २९ रक्तदान शिबिराचे आयोजन करून अनेक लोकांना जीवनदान देण्याचे कार्य यांनी केले आहे. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून मनोज छाबडा यांचे अभिनंदन होत आहे.

# रा. कॉ. युवक जिल्हाध्यक्षपदी किशोर तावरे




**पैठण दि १५ :** राष्ट्रवादी भवन मुंबई येथे राष्ट्रवादी कॉंगेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री श्रीमती.सुनेत्राताई अजितदादा पवार,व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशध्यक्ष,खासदार श्री.सुनिल तटकरे यांच्या आदेशाने व आमदार तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष.श्री.सतिश चव्हाण यांच्या शिफारसीनुसार किशोर पा.तावरे यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस युवक कॉंग्रेसच्या छत्रपती संभाजीनगर ग्रामीण जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या मुंबई येथील प्रदेश कार्यालयात आमदार तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस कोषाध्यक्ष श्री.शिवाजीराव गर्जे आमदार प्रतापराव पा.चिखलीकर व युवक प्रदेशध्यक्ष निखिल ठाकरे यांच्या हस्ते व ,प्रदेश सरचिटणीस श्री.दिलीपनाना बनकर,मा. सभापती श्री.महेशभाऊ उबाळे,श्री.अमर पाटील प्रदेशसरचिटणीस राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस यांच्या प्रमुख उपस्थितीत तावरे यांना युवक जिल्हाध्यक्ष पदाचे नियुक्तीपत्र देण्यात आले,या निवडीबद्दल पैठण विधानसभा अध्यक्ष विनोद पा.तांबे,जिल्हाउपाध्यक्ष ज्ञानेश्वर पा.कापसे,तालुकाध्यक्ष विलासभैय्या शेळके,शहरध्यक्ष नगरसेवक जितू परदेशी,नगरसेवक बजरंग लिंबोरे,नगरसेविका अलकाताई परदेशी, महिला तालुका अध्यक्ष अंजलीताई बांगर, सेवादल जिल्हाध्यक्ष.अनिल हजारे,रामदास गिधाने,कल्याण राठोड,छायाताई कोठुळे आदिनी शुभेच्छा दिल्या या प्रसंगी एकनाथ जाधव,ऋषिकेश चौधरी,कुणाल तांगडे आदी उपस्थितीत होते.

# एआय प्लस स्मार्टफोन 1,000 हून अधिक सर्व्हिस टचपॉइंट्स ओलांडणार

**मुंबई :** एआय प्लस स्मार्टफोन भारतात आपला विक्रीनंतरचा अनुभव सुधारत असून, देशभरात 1,000 हून अधिक सर्व्हिस सेंटर्सपर्यंत आपल्या सेवा नेटवर्कचा विस्तार करण्याची योजना आखत आहे. कंपनी या दिवाळीत दिल्लीत आपले पहिले एक्सक्लुझिव्ह एआय प्लस सर्व्हिस सेंटर सुरू करण्यासही सज्ज आहे. आपल्या भौतिक सेवा पायाभूत सुविधांचा विस्तार करण्याबरोबरच, हा ब्रँड एआय प्लस असिस्टन्स ॲप सादर करत आहे. हे एक एकीकृत डिजिटल प्लॅटफॉर्म असून, डिव्हाइस सपोर्ट, सर्व्हिस बुकिंग, तिकीट ट्रॅकिंग आणि समस्यानिवारण सहाय्यासाठी वन-स्टॉप सोल्युशन प्रदान करण्याच्या उद्देशाने ते तयार करण्यात आले आहे. या विस्तारामुळे 800 हून अधिक सर्व्हिस सेंटर्सच्या विद्यमान नेटवर्कमध्ये 200 हून अधिक सर्व्हिस सेंटर्सची भर पडेल, ज्यामुळे संपूर्ण भारतात ब्रँडच्या विक्रीनंतरच्या सेवेची व्याप्ती आणखी वाढेल. या भौतिक आणि डिजिटल विस्ताराचा उद्देश, सेवेची विनंती करण्यापासून ते तिच्या निराकरणाचा मागोवा घेण्यापर्यंत, एआय प्लस ग्राहकांसाठी मालकीचा अनुभव अधिक सोपा, पारदर्शक आणि सुसंगत बनवणे हा आहे.

# शंखेश्वर पार्श्वनाथ जिनालयात 1008 दीपांनी महाआरती

## गूगले परिवाराला कुमारपाल महाराजा महाआरतीचे सौभाग्य; शोभायात्रेत जैन बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** सिडको एन-३ येथील गुरु गौतम श्री श्वेतांबर वर्धमान जैन सेवा संघ संचलित श्री शंखेश्वर पार्श्वनाथ जैन जिनालयात पर्युषण महापर्वानिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमांतर्गत वर्षातून एकदाच होणारी कुमारपाल महाराजा महाआरती सोमवारी (दि. १४) भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. श्रेष्ठीवर्य श्रीमान सा. प्रकाशलालजी, अतुलकुमारजी व प्रीतमकुमारजी गूगले परिवाराला महाआरतीचा मान मिळाला.

सायंकाळी आठ वाजता अहिंसा भवन येथून शाही बग्गीतून भव्य शोभायात्रेला सुरुवात झाली. राजेशाही पोशाखातील गूगले परिवार, फेटे परिधान केलेले सदस्य, बँड पथक आणि ढोल पथकाच्या सहभागाने शोभायात्रा मंदिरात पोहोचली. मंदिर परिसरात भाविकांनी उत्साहात स्वागत केले. मंदिराच्या मंडपात संगीतकार अभिषेक जैन यांनी भक्तिगीतांच्या माध्यमातून वातावरण भक्तिमय केले. त्यानंतर १००८ दीपकांच्या प्रकाशात कुमारपाल महाराजा महाआरती करण्यात आली. यावेळी उपस्थित सर्व भाविकांना आरतीसाठी दीपक देण्यात आले. शेकडो दीपांच्या प्रकाशाने मंदिर परिसर उजळून निघाला.

यावेळी कॅबिनेट मंत्री अतुल सावे, खासदार डॉ. भागवत कराड, सकल जैन समाजाचे कार्याध्यक्ष आमदार सुभाष झांबड, माजी खासदार चंद्रकांत खैरे, आमदार मिठालाल कांकरिया, रतीलाल मुगदिया, सुरेश जैन, डॉ. प्रकाश झांबड, रवि मुगदिया, राजू संचेती, अजित जैन, अजय संघवी यांच्यासह सिडको रॉयल जैन ग्रुपचे सदस्य आणि सकल जैन समाजातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, पर्युषण महापर्वानिमित्त दि. ८ सप्टेंबरपासून जिनालयात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भक्ती संध्येचा लाभ मनोज कन्हैयालाल रुणवाल परिवारातर्फे देण्यात आला, तर लहान मुलांसाठी बक्षिसांचे आयोजन मुथा मोटर्स परिवारातर्फे करण्यात आले.

# गंगापूरमध्ये आमदारांविरोधातील बेताल वक्तव्याप्रकरणी चौकशीची मागणी



तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.१६:**पंचायत समिती कार्यालयासमोर शिक्षकांच्या आंदोलन दरम्यान आमदार प्रशांत बंब यांच्याविरोधात अक्षेपार्ह व बेताल वक्तव्य केल्याप्रकरणी पद्मकर इंगळे यांच्या विरोधात गंगापूर पोलीस स्टेशनमध्ये लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टीच्या गंगापूर तालुका कार्यकारिणीच्या वतीने हा जाहीर निषेध नोंदवत कारवाईची मागणी केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, १५ सप्टेंबर २०२६ रोजी गंगापूर पंचायत समितीसमोर शिक्षकांच्या विविध मागण्यांसाठी 'धरणे आंदोलन' आयोजित करण्यात आले होते. या आंदोलनादरम्यान अनेक वक्त्यांनी आपले विचार मांडले. मात्र, याच दरम्यान पद्मकर इंगळे (रा. संभाजीनगर) यांनी मूळ विषय सोडून आमदार प्रशांतजी बंब यांच्यावर अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन टीका केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.या बेताल वक्तव्यामुळे संतप्त झालेल्या भारतीय जनता पार्टीच्या गंगापूर तालुका कार्यकारिणीने या प्रकरणाचा तीव्र निषेध केला आहे. याप्रकरणी संबंधितांचे कॉल डिटेल्स, सीडीआर आणि व्हिडिओ रेकॉर्डिंग तपासून तात्काळ कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी पोलीस निरीक्षक, गंगापूर पोलीस स्टेशन यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे यावेळी प्रदीप भैय्या पाटील, दीपक साळवे, रवींद्र चव्हाण, विजय पानकडे, राकेश कळसकर, मारुती खैरे,मधुकर वालतुरे,आनंद पाटील,वसंत खताळ,अरुण लांडे,अत्तर जोहरी, राजेंद्र राठोड, कृष्णकांत व्यवहारे, अतुल रासकर, अरुण सागर, भारत पाटील,राहुल सटाले, भिकचंद कोठुळे, भागिनाथ साळुंखे,संदीप बोजवारे,ज्ञानेश्वर पवार, सतीश बारे, रामेश्वर पाटील, तेजस सोनवणे,मोहसीन शेख, गणेश पाटील,सोमनाथ शिंदे,सलमान शेख,योगेश चव्हाण, ऋषिकेश जाधव,रफिक पठाण,संजय

# कन्नडमध्ये गणेशोत्सवानिमित्त फळझाडे व फुलझाडांच्या रोपांचे वाटप



तभा वृत्तसेवा

**कन्नड :**दि.१६ सप्टेंबर - गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत बाळू बनकर मित्र मंडळ, कन्नड यांच्या वतीने 'संकल्प एक मूर्ती, एक झाड' हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे यंदाचे ११ वे वर्ष असून, सोमवारी (दि. १४ सप्टेंबर) सकाळी ९ वाजता नागरिकांना फळांची व फुलांची रोपे वाटप करण्यात आली. उपक्रमाला नागरिक, गणेशभक्त आणि निसर्गप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

गणेशोत्सवात गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यासोबतच प्रत्येक कुटुंबाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, या उद्देशाने गेल्या ११ वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. पर्यावरण संवर्धनाची गरज लक्षात घेऊन नागरिकांमध्ये वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाची भावना निर्माण करणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

यावेळी विविध प्रकारची फळांची तसेच फुलांची रोपे नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली. अनेक नागरिकांनी उत्स्फूर्तपणे रोपे स्वीकारून ती आपल्या घराच्या परिसरात, शेतात तसेच उपलब्ध जागेत लावण्याचा संकल्प केला. गणेशोत्सवाच्या पारंपरिक उत्साहाला पर्यावरण संवर्धनाची जोड देणाऱ्या या उपक्रमातून 'एक मूर्ती, एक झाड' हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

या उपक्रमासाठी स्वराज प्रतिष्ठान, कन्नड यांचे विशेष सहकार्य लाभले. निसर्गप्रेमी व समाजसेवक संतोष बनकर आणि विकास बनकर यांच्या पुढाकारातून उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. गेल्या अकरा वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमातून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवडीला प्रोत्साहन मिळत असून, पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे. नागरिकांनीही अशा उपक्रमांमध्ये सहभागी होऊन वृक्षलागवड करण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले.

# मतदार नोंदणीसाठी 19, 20, 26 व 27 सप्टेंबरला विशेष शिबिरे

**अहिल्यानगर, दि. १६ :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत मतदार याद्या अद्ययावत करण्याची कार्यवाही सुरू आहे. या कार्यक्रमांतर्गत नवीन मतदारांची नोंदणी, मतदार यादीतील विद्यमान नोंदींमध्ये दुरुस्ती तसेच नाव वगळण्यासाठी अर्ज करण्याची सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या अनुषंगाने राज्यातील सर्व मतदान केंद्रांवर १९, २०, २६ आणि २७ सप्टेंबर २०२६ रोजी विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या दिवशी संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत नियुक्त मतदान केंद्रांवर उपस्थित राहणार आहेत. या विशेष शिबिरांमध्ये पात्र नागरिकांची नवीन मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी अर्ज स्वीकारणे, मतदार यादीतील विद्यमान नोंदींमध्ये आवश्यक दुरुस्ती करण्यासाठी अर्ज स्वीकारणे तसेच मतदार यादीतील नाव वगळण्यासाठी अर्ज स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पात्र नागरिकांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याबाबत आवश्यक मार्गदर्शनही करण्यात येणार आहे. महिला तसेच दिव्यांग नागरिकांच्या समावेशकतेसाठी विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे.

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाचा कालावधी ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ असा निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत नागरिकांनी नवीन मतदार नोंदणी तसेच मतदार यादीतील नोंदींची दुरुस्ती आणि नाव वगळण्याच्या सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

१ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण झालेल्या पात्र तरुण नागरिकांनाही मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे पात्र तरुणांनी विशेष शिबिरांचा लाभ घेऊन मतदार म्हणून नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

नवीन पात्र मतदारांची जास्तीत जास्त नोंदणी व्हावी यासाठी जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांमध्येही विशेष शिबिरे आयोजित करून जनजागृती व नोंदणीची कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नागरिकांनी मतदार यादीतील आपल्या नावाची नोंद तपासून आवश्यक असल्यास संबंधित अर्ज भरून द्यावा. एकही पात्र नागरिक मतदार नोंदणीपासून वंचित राहू नये, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी विशेष प्रयत्न करावेत, असे आवाहन अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.

# दहा दिवस चालणाऱ्या महोत्सवात मांडव आणि रांगेच्या भागात अंदाजे 500 इकोलिंक बीलडीसी फॅन्सची जोडणी

## मोठ्या प्रमाणावर ऊर्जा बचत करणारा थंडावा देऊन अंदाजे 4200 युनिटस विजेचा वापर




तभा वृत्तसेवा

***मुंबई* :** गणेश चतुर्थीच्या पार्श्वभूमीवर लायटिंग क्षेत्रातील आघाडीची कंपनी सिग्निफायने लालबागच्या राजाच्या चरणी ऊर्जा बचत करणाऱ्या इकोलिंक बीएलडीसी पंख्यांची जोडणी केली आहे. दहा दिवस चालणाऱ्या या महोत्सवात मांडव तसेच दर्शनरांगेच्या परिसरात सुमारे ५०० इकोलिंक बीएलडीसी फॅन्स बसविण्यात आले असून, त्यामुळे लाखो भाविकांना गारवा आणि अधिक आरामदायी दर्शनाचा अनुभव मिळणार आहे.

दूरदूरहून येणाऱ्या भाविकांना दर्शनासाठी अनेक तास रांगेत उभे राहावे लागते. या पार्श्वभूमीवर इकोलिंकच्या एअरोज्वेल, एअरोट्रिओ, एअरोक्रिस्टल आणि एअरोक्कॉड 3B या मॉडेल्सची स्थापना करण्यात आली आहे. ब्रशलेस डायरेक्ट करंट (बीएलडीसी) तंत्रज्ञानावर आधारित हे पंखे पारंपरिक इंडक्शन मोटर पंख्यांच्या तुलनेत सुमारे ५० टक्क्यांपर्यंत ऊर्जा बचत करतात. दहा दिवसांच्या कालावधीत हे पंखे २४ तास कार्यरत राहणार असून, अंदाजे ४,२०० युनिट्स विजेचा वापर करून मोठ्या प्रमाणात ऊर्जा कार्यक्षमतेचे उदाहरण निर्माण करणार आहेत. यामुळे भाविकांना थंडावा मिळण्यासोबतच शाश्वत ऊर्जावापराबाबत जनजागृतीही होणार आहे.

*सिग्निफाय ग्रेटर इंडियाचे हेड – स्ट्रॅटेजी अँड मार्केटिंग निखिल गुप्ता यांनी सांगितले की,* "गणेशोत्सवासारख्या मोठ्या उत्सवात नाविन्यपूर्ण आणि ऊर्जा बचत करणारे तंत्रज्ञान प्रत्यक्ष लोकांपर्यंत पोहोचविण्याची संधी मिळत आहे. इकोलिंक बीएलडीसी फॅन्सच्या माध्यमातून आम्ही लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांचा प्रवास अधिक आरामदायी करण्याचा प्रयत्न करत आहोत."

याशिवाय, संपूर्ण परिसरात इकोलिंकचे ब्रँडिंग, संवादात्मक उपक्रम आणि आकर्षक भेटवस्तूंच्या माध्यमातून भाविकांना ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाची माहिती दिली जाणार आहे.

# कांचनवाडी मल्टि स्पोर्ट्स मार्शल आर्टस् ट्रेनिंग सेंटर येथे झालेल्या जिल्हास्तरीय तांग सु डो स्पर्धा उत्साहात संपन्न



बिडकीन दि १६ सप्टेबर - डिस्टिक अँड सिटी तांग सु डो स्पोर्ट्स असोसिएशन छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने दि ६ सप्टेबर रोजी आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय तांग- सु डो स्पर्धा व पंच टेक्निकल सेमिनार उत्साहात संपन्न कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तांग सु डो राज्य संघटनेचे अध्यक्ष, रॉकी डिसुझा, होते यांच्या हस्ते विजयी विद्यार्थ्यांना मेडल प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले व त्यांनी खेळाची सखोल माहिती खेळाची नियमावली खेळाडूंना व प्रशिक्षकांना सहज व सोप्या रीतीने सांगितले , जिल्हा व शहर तांग सु डो स्पोर्ट्स असोसिएशन छत्रपती संभाजीनगर संघटनेचे अध्यक्ष पवन घुगे व सचिव प्रविण घुगे, उपाध्यक्ष अनुप बोराळकर, सहसचिव कुणाल पाटील, प्रशिक्षिका नंदा घुगे, राधा घुगे, ज्ञानेश्वरी सोनवणे,प्रशिक्षक श्याम बुधवंत, राम चौरे, गौरव टोकटे यशोधन घुगे. अनुश्री घुगे,यांनी राज्य रेफ्री टेक्निकल सेमिनार मध्ये भाग घेतला होता याप्रसंगी महाराष्ट्र राज्य संघटनेचे अध्यक्ष रॉकी डिसूजा, सचिव मोहिते सर यांच्या मार्गदर्शनाखाली रेफ्री प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले

विजयी झालेले विद्यार्थी पुढील होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी मुंबई येथे निवडले गेलेले आहेत -

# श्री.अमृतेश्वर शिक्षक सहकारी पतसंस्था सोयगावच्या अध्यक्ष पदी पंकज रगडे यांची बिनविरोध निवड



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.१६ सप्टेंबर :** श्री.अमृतेश्वर शिक्षक सहकारी पतसंस्था सोयगावच्या अध्यक्ष पदाची निवड अध्याशी अधिकारी विलास घुगे,सहकार अधिकारी सोयगाव श्रेणी-१ यांच्या उपस्थितीत ही निवड करण्यात आली.यावेळी पंकज रगडे यांची अध्यक्ष पदी बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी पतसंस्थेचे माजी अध्यक्ष विठ्ठल राठोड यांनी नवनियुक्त चेअरमन पंकज रगडे यांचे स्वागत केले तसेच अध्याशी अधिकारी विलास घुगे यांनी नवनियुक्त चेअरमन यांचा सत्कार केला.यावेळी शिक्षक सहकार पॅनलचे पॅनल प्रमुख दिवाकर चोपडे,भास्कर चौधरी,अनिल निकम,राजेश जंजाळ,गोपाल चौधरी,हरिदास काटोले यांची प्रमुख उपस्थिती होती.त्याचप्रमाणे सोयगाव तालुका प्राथमिक शिक्षक संघाचे तालुकाध्यक्ष कृष्णा पाटील,माजी चेअरमन शकूर शेख,व्हाईस चेअरमन दुर्गादास बलांडे,मानद सचिव संदीप चौधरी,सहकार पॅनलचे संचालक संतोष वाघ,संदिप सोनवणे,रघुनाथ काटोले तसेच संस्थेचे कर्मचारी प्रमोद जाधव,रमेश वामने हे उपस्थित होते.भास्कर चौधरी व दिवाकर चोपडे पतसंस्थेचे माजी संचालक,चेअरमन यांनी तसेच तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अक्षय धंदर,लिपिक भिकन पाटील,चेअरमन यांनी अध्यक्ष निवडीबद्दलअभिनंदन करून सभासद व पतसंस्था हितासाठी काम करण्यास शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी जेष्ठ शिक्षक भिमराव सुरवाडे,प्रशांत पाटील उपस्थित होते.

# श्री साईबाबा हॉस्पिटलला न्यूरोसर्जरीसाठी 49 लाखांचे अत्याधुनिक उपकरण देणगी

शिर्डी (प्रतिनिधी) श्री साईबाबा हॉस्पिटल न्यूरोसर्जरी विभागासाठी सुमारे ४९ लाख रुपये किमतीचे 'हाय स्पीड ड्रिल सिस्टीम फॉर न्यूरोसर्जरी' हे अत्याधुनिक वैद्यकीय उपकरण देणगीस्वरूपात प्राप्त झाले आहे. प्रिझ्मा ग्लोबल लिमिटेडच्या वतीने कंपनीचे संस्थापक अध्यक्ष श्रीराम अय्यर यांनी ही महत्त्वपूर्ण देणगी संस्थानला प्रदान केली.



आज या अत्याधुनिक उपकरणाचे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते विधिवत पूजन करुन लोकार्पण करण्यात आले.

या प्रसंगी रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. प्रीतम वडगावे, न्यूरोसर्जन डॉ. संतोष उनवणे, डॉ. विश्वनाथ कामतगी, , बायोमेडिकल इंजिनिअर श्रद्धा कोते, प्रणाली कांबळे, कार्तिक पांगरकर, सहाय्यक अधीसेविका मंदा थोरात यांच्यासह रुग्णालयातील डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

न्यूरोसर्जरीतील मेंदू व मज्जासंस्थेशी संबंधित विविध गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांसाठी हे अत्याधुनिक उपकरण अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या उपकरणामुळे शस्त्रक्रियांची अचूकता वाढण्यास, उपचार अधिक प्रभावी होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

**मा. प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर**

क्री. एम. ए. 362/2026

अर्जदारः -निता सोमीनाथ बढ़े वय 30 वर्ष धंदा शेती ग. बोरगाव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

गैरअर्जदारः- ग्रामपंचायत अधिकारी ग्रुप-ग्रामपंचायत बोरगाव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

प्रकरणः- जन्म मृत्यू अधिनियम 1969 कलम 13 (3) प्रमाणे अर्जदारांच्या मुलाची जन्माची नोंद ग्रामपंचायत अधिकारी बोरगाव ता. गंगापूर यांच्या जन्म नोंदीच्या रजिस्टर ला नोंदणी करण्यास्तव ग्रामपंचायत अधिकारी बोरगाव यांना आदेशित करणे बाबत.

अर्जदार बोरगाव ता. गंगापूर येथील कायमचे रहिवासी आहे. अर्जदार यांना कायद्याबाबत व इतर नियमाबाबत माहित नसल्यामुळे अर्जदाराच्या मुलगा नामे सार्थक सोमीनाथ बढे याचे नाव जन्म रजिस्टर ला गैरअर्जदाराच्या कार्यालयात मुदतीत केलेली नाही. अर्जदाराचा मुलगा नामे सार्थक सोमीनाथ बढे याचा जन्म दिनांक 11/11/2008 रोजी दवाखान्यात झालेला आहे अर्जदार यांना त्यांचा मुलाची नोंद ग्रामपंचायत बोरगाव यांचे कार्यालयात करवयांची राहून गेलेले आहे. अर्जदाराच्या मुलास शासकीय तसेच निम शासकीय व आधार कार्ड अपडेट करण्यासाठी व इतर सरकारी कार्यालयात महत्वाच्या कामासाठी जन्म नोंदीच्या प्रमाणप्रत्रासाठी खूप अडचण येत आहे तसेच अर्जदाराच्या मुलास पुढील शेक्षणिक कामासाठी हि अत्यंत आवशकता आहे. अर्जदार हा त्याचे मुलाची जन्मांची नोंद गैरअर्जदार यांच्या कार्यालयात जन्माच्या प्रमाणपत्रा साठी गेले असता गैरअर्जदार ग्रामपंचायत अधिकारी बोरगाव यांनी अर्जदारांना सांगितले की, तुमच्या मुलाची जन्माच्या नोंदी करण्यासाठी वेळ झालेला असून जास्त विलंब झालेला असल्यामुळे सदरची नोंद घेण्यासाठी मा. प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालय गंगापूर यांच्या आदेशाची आवशकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराचा अर्जास व त्यातील जन्माच्यानोंदीस कोणाचा काही आक्षेप उजर असेल तर संबन्धीतानी त्यांचा असलेला आक्षेप उजर या मा. न्यायालयात व्यक्तिश अथवा विधीज्ञ मार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून 30 दिवसाच्या आत नोंदवावा मदतीनंतर आलेला आक्षेप उजर गृहीत धरला जाणार नाही. व हे न्यायालय अर्जदाराच्या हक्कात मागणी प्रमाणे आदेश पारित करील.

करिता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्याने आज दिनांक 16/09/2026 रोजी दिले.

लिपिक. सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

**जाहिर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. 194/2026

अर्जदारः- 1) नजमाबानु असीफहुसेन खोखर, वयः 48 वर्षे, धंदा घरकाम, रा मथवास ता.दसाडा जि.सुरेंद्र नगर (गुजरात) 2) रिहानाबानो सय्यद मुस्तफा, वय 46 वर्षे, धंदा घरकाम, रा. 222. एस आर नं 166. गल्ली नं. 02. रौनकाबाद, मालेगांव ता. मालेगांव जि. नाशीक, 3) शबाना शेख रहीम, वयः 40 वर्षे, धंदा घरकाम, रा. सर्वे नं. 164, घर नं. 111. मुख्य रोड, अब्बास नगर, पाट किराणा, मालेगांव ता. मालेगांव जि. नाशीक 4) अशपाक मोहम्मद उर्फ महमुद शेख, वयः 38 वर्षे, धंदा शेती 5) शेख मुस्ताक शेख मोहम्मद, वय 36 वर्षे, धंदा शेती. वरील अर्जदार नं. 04 व अर्जदार नं. 05 रा. ठाणा ता. सोयगाव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

// विरुध्द //

गैरअर्जदारः- निरंक

अर्ज :- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की. उपरोक्त अर्जदारानी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), याच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे शेख मोहम्मद शेख गणी हे दिनांकः 14/10/2023 ला मौजे मालेगांव ता मालेगाव जि. नाशीक येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहे. अर्जदाराना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारानी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे

(पुढील दिनांकः 17/10/2026)

तरी. ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यानी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासून 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नौदवावा अन्यथा अर्जदाराना कायदेशीर वारस प्रसाणपत्र देण्यात येईल.

आज दिनाक 16/09/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक
(दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगाव)

## अग्रलेख

# तपासाची नवी 'दिशा'

दिशा सालियानच्या मृत्यूला सहा वर्षे उलटली, पण या घटनेतील गूढ अद्याप संपलेले नाही. सहा वर्षांहून अधिक काळापूर्वी म्हणजे ८ जून २०२० रोजी मुंबईतील मालाड परिसरातील एका इमारतीवरून पडून दिशाचा मृत्यू झाला. सुरुवातीला हा प्रकार आकस्मिक मृत्यू म्हणून नोंदविला गेला आणि तपास यंत्रणांनी घातपाताची शक्यता नाकारली. त्यानंतर अवघ्या सहा दिवसांनी अभिनेता सुशांत सिंह राजपूतचा मृत्यू झाला आणि दोन घटनांमध्ये संबंध असल्याच्या चर्चा सुरू झाली. कारण दिशा ही सुशांतची मॅनेजर होती. पुढे या चर्चेला राजकीय आरोप-प्रत्यारोपांची जोड मिळाली. त्यात दीर्घ काळ गेला. कोर्ट कचेरी झाली. तपासातील कथित त्रुटी, दिशाच्या कुटुंबीयांकडून उपस्थित केले गेलेले प्रश्न आणि आता सीबीआयकडून नव्याने सुरू झालेल्या तपासामुळे हे प्रकरण नव्याने चर्चेत आले आहे. आता तरी दिशाला न्याय मिळेल का, हा एक चर्चेचा प्रमुख प्रश्न आहे. दिशाच्या मृत्यूबाबत तिचे वडील सतीश सालियान यांनी गंभीर आरोप केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, दिशावर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली आणि त्यानंतर हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाला. काही प्रभावशाली व्यक्ती आणि तत्कालीन पोलिस अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबतही त्यांनी संशय व्यक्त केला. त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत स्वतंत्र तपासाची मागणी केली. मात्र, यातील एक महत्त्वाचा विरोधाभासही नोंदवावा लागेल. दिशाच्या मृत्यूनंतर सुरुवातीच्या काळात तिच्या आई-वडिलांनी पोलिसांना दिलेल्या जबाबात घातपाताचा कोणताही संशय नसल्याचे सांगितले होते. नंतर तिच्या वडिलांनी भूमिका बदलून गंभीर आरोप केले. त्यामुळे एकीकडे त्यांच्या आरोपांची सत्यता तपासणे आवश्यक आहे आणि त्यांच्या पूर्वीच्या आणि नंतरच्या भूमिकेतील फरकही गंभीरपणे तपासणे तेवढेच आवश्यक आहे. न्यायालयाने प्राथमिक तपासातील अनेक विसंगतींकडे लक्ष वेधले होते. तपासाची प्रक्रिया, पंचनामा, वैद्यकीय आणि न्यायवैद्यकीय मुद्दे तसेच दंडाधिकाऱ्यांच्या चौकशी यासंदर्भात न्यायालयाने गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. याच कारणामुळे २ सप्टेंबर २०२६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने सीबीआयकडे तपास सोपविण्याचे निर्देश दिले. १४ सप्टेंबरला सीबीआयने एफआयआर नोंदवून तपासाला सुरुवात केली आहे. दिशाच्या वडिलांचा जबाबही सीबीआयने नोंदविला आहे.

या प्रकरणात सध्या सर्वात मोठी गरज आहे ती यातील सत्य बाहेर येईपर्यंत संयमाची. सीबीआयने एफआयआर नोंदवताच माध्यमांमध्ये विविध व्यक्तींची नावे चर्चेत आली आहेत. काही वृत्तांनुसार एफआयआरमध्ये आदित्य ठाकरे, सूरज पांचोली, डिनो मोरिया, रिया चक्रवर्ती यांच्यासह अनेक व्यक्तींची नावे तपासाच्या संदर्भात आली आहेत. एखाद्या व्यक्तीचे नाव एफआयआरमध्ये येणे म्हणजे ती व्यक्ती दोषी आहे, असा अर्थ अजिबात होत नाही. स्वतः उच्च न्यायालयाने सीबीआयला स्पष्टपणे सांगितले आहे की, पुरेसा ठोस पुरावा मिळेपर्यंत कोणालाही आरोपी मानू नये. तपासातून दखलपात्र गुन्हा सिद्ध झाला तर आरोपपत्र दाखल करावे; अन्यथा योग्य ती क्लोजर प्रक्रिया करावी, असे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत. म्हणूनच आता या प्रकरणात टोकाची भूमिका टाळली पाहिजे. तपास पूर्ण होण्यापूर्वी 'दिशाची हत्याच झाली' असा दावा करणे अयोग्य आहे. 'सहा वर्षांपूर्वी तपास झाला, त्यामुळे आता काहीच प्रश्न उरलेले नाहीत' हेही म्हणणे चुकीचे आहे. आता सीबीआयला तपास करू देणे आणि निष्कर्षाची वाट पाहणे हेच इष्ट.

दिशा सालियान प्रकरणाला राजकीय रंग मिळण्यामागे अनेक कारणे आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या प्रकरणात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांच्याविरुद्ध आरोप करण्यात आले होते. त्यानंतर या प्रकरणाचा वापर राज्याच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोपांसाठी झाला. विरोधकांनी प्रश्न उपस्थित केले; सत्ताधाऱ्यांनी तपासातील त्रुटी दाखवून दिल्या; संबंधित नेत्यांनी आरोप फेटाळले. परिणामी, एका तरुणीच्या मृत्यूभोवतीचा तपास हा हळूहळू राजकीय संघर्षाचा भाग बनला. त्यातील गुंतागुंत वाढत गेली. किमान एखाद्याच्या मृत्यूचे प्रकरण राजकारणासाठी अशा वळणाला जाऊ नये. राजकीय फायदा-तोटा पाहून एखाद्या तपासाला विशिष्ट दिशा देण्याचा प्रयत्न झाला तर तो न्यायाच्या प्रक्रियेसाठी घातक ठरतो. उच्च न्यायालयानेही व्यक्तिविशेषांविरुद्ध निष्कर्ष नोंदविण्याऐवजी स्वतंत्र तपासावर भर दिला आहे. म्हणूनच या प्रकरणाकडे राजकीय चौकटीत पाहण्याऐवजी 'दिशाच्या मृत्यूमागे नेमके काय घडले आणि तिची हत्याच झाली असेल तर त्यात कुणा-कुणाचा दोष आहे?' या एकाच प्रश्नाच्या संदर्भात पाहिले पाहिजे. दिशाला न्याय मिळण्याची तारीख आज कोणीही सांगू शकत नाही. कारण सध्या तपास नुकताच नव्याने सुरू झाला आहे. सीबीआयला उपलब्ध कागदपत्रे, वैद्यकीय अहवाल, फॉरेन्सिक पुरावे, इलेक्ट्रॉनिक डेटा, साक्षीदारांचे जबाब आणि अन्य पुरावे तपासावे लागतील. त्यानंतर गुन्हा सिद्ध करण्याइतका पुरावा उपलब्ध झाला तर आरोपपत्र दाखल होईल. त्यानंतर न्यायालयीन खटला, साक्षी, उलटतपासणी, पुराव्यांचे मूल्यमापन आणि त्यानंतर निर्णय, ही संपूर्ण प्रक्रिया पार पाडावी लागेल. भारतीय न्यायव्यवस्थेची हीच मोठी समस्या आहे. न्याय मिळतो; पण तो मिळण्यासाठी लागणारा काळ पीडित कुटुंबांच्या संयमाची परीक्षा घेतो. या प्रकरणात एक गोष्ट आशादायक आहे. उच्च न्यायालयाने तपासाला अनिश्चित काळ चालू ठेवण्याऐवजी त्यासाठी चौकट निश्चित केली आहे. सीबीआयला तपास पूर्ण करून आरोपपत्र दाखल करण्याचे किंवा गुन्हा सिद्ध होत नसल्यास क्लोजर रिपोर्ट देण्याचे निर्देश दिले गेलेले आहेत. त्यामुळेच आता दिशा प्रकरणातील तपासात काहीतरी ठोस निष्कर्ष निघण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मुंबई पोलिसांच्या तपासावर उच्च न्यायालयाने प्रश्न उपस्थित केले आहेत. सीबीआयवर आता मोठी जबाबदारी आहे. सीबीआय ही देशातील मातब्बर तपास यंत्रणा आहे. आता सीबीआयपुढे दिशा प्रकरणाचा तपास करण्याइतपत आव्हान नाही, तर तपास यंत्रणांवरील जनतेचा विश्वास पुन्हा दृढ करण्याचे आव्हान आहे. सीबीआयने हत्या सिद्ध करणारे पुरावे मिळवले, तर ते न्यायालयासमोर मांडले पाहिजेत. पुरावे मिळाले नाहीत, तर तेही स्पष्टपणे सांगितले पाहिजे. दोषी व्यक्ती प्रभावशाली असो किंवा सामान्य नागरिक, कायद्याचा मापदंड एकच असला पाहिजे. गुन्हेगारी प्रकरणांच्या तपासात वेळ निघून जाणे म्हणजे पुरावे नष्ट होण्याची, साक्षीदारांच्या आठवणी धूसर होण्याची शक्यता वाढणे. म्हणूनच या प्रकरणाचा निकाल काहीही येवो, आता तपास पूर्ण होऊन सत्य बाहेर आले पाहिजे. संशयास्पद मृत्यूचे प्रकरण वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवणे हा देखील एकप्रकारे अन्यायच असतो. दिशा आत्महत्येला प्रवृत्त झाली की तिचा अपघाती मृत्यू झाला की तिची हत्या झाली, याचा अंतिम निर्णय पत्रकार, अँकर्स, सोशल मीडिया, राजकीय व्यासपीठे, राजकीय पक्षांचे प्रवक्ते किंवा टीव्ही स्टुडिओंनी देऊ नये. तो निर्णय पुरावे आणि कायद्याच्या आधारे न्यायालयानेच दिला पाहिजे. आज दिशाच्या कुटुंबाला सर्वात जास्त प्रतीक्षा आहे ती सत्याची आणि न्यायाची. तपासातून न्यायप्रक्रियेतून निघणाऱ्या प्रश्नाचे उत्तर कुणाच्या राजकीय सोयीचे असो वा नसो, ते सत्य म्हणूनच सर्वांपुढे आले पाहिजे. सीबीआयचा तपास हे त्या दिशेने टाकले गेलेले नवे पाऊल आहे. सीबीआयने न्याय्य दृष्टीने या घटनेकडे पाहिले पाहिजे. सीबीआयचे पाऊल अधिक वेगाने पुढे जावो आणि दिशा सालियानसारख्या निरपराध जीवाच्या अंतासाठी कारणीभूत असलेले जे कुणी असतील, त्यांना लवकरात लवकर कायद्याचा हंटर बसो, एवढीच सामान्यजनांची अपेक्षा आहे. तेच दिशाच्या कुटुंबाला-आप्तांनाही हवे आहे. ■

# कधी आणि कसा होणार दुष्काळमुक्त मराठवाडा?

## मुक्तीचा अमृतकाळ संपला; विकासाचा अनुशेष मात्र कायम!

मुख्यमंत्री मराठवाड्यात आले की सातत्याने सांगतात की, "मराठवाड्यातील पुढची पिढी दुष्काळ पाहणार नाही." हे आश्वासन निश्चितच आशादायी आहे. मात्र, आजची वस्तुस्थिती पाहता हा संकल्प प्रत्यक्षात कधी आणि कसा साकार होणार, हा प्रश्न मराठवाड्यातील जनतेसमोर उभा आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला आणि त्यानंतर १३ महिन्यांनी, १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या जोखडातून मुक्त झाला. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या प्रक्रियेत मराठवाडा महाराष्ट्रात सहभागी झाला. सर्वांगीण विकासाचे स्वप्न उराशी बाळगून महाराष्ट्रात सहभागी झालेल्या या प्रदेशाचा विकासाचा अनुशेष मात्र आजही कायम आहे. शिक्षण, उद्योग, रोजगार, शेती आणि सिंचन अशा अनेक क्षेत्रांत मराठवाड्याला अपेक्षित न्याय मिळालेला नाही. यातील सर्वात गंभीर आणि अग्रक्रमाचा प्रश्न म्हणजे सिंचनाचा अनुशेष.

**सततचा दुष्काळ : मराठवाड्याचे न भरून निघणारे नुकसान**

दर दोन-तीन वर्षांनी ओला किंवा कोरडा दुष्काळ, ही परिस्थिती मराठवाड्याच्या वाट्याला सातत्याने येत आहे. दुष्काळामुळे शेती, पशुधन, फळबागा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे प्रचंड नुकसान होते. सिंचनाअभावी शेती करणे दिवसेंदिवस कठीण आणि खर्चिक होत आहे. परिणामी गरीबी, बेरोजगारी, स्थलांतर आणि शेतकरी आत्महत्या अशा दुष्टचक्रात ग्रामीण समाज अडकला आहे. अनेक गावांना आजही टँकरवर अवलंबून राहावे लागते. "टँकरवाडा" अशी ओळख निर्माण होणे ही मराठवाड्यासाठी अत्यंत वेदनादायक बाब आहे. पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटल्याशिवाय मराठवाड्याचा शाश्वत विकास शक्य नाही.

**पाणी उपलब्धतेतील प्रादेशिक असमतोल :** महाराष्ट्रातील प्रदेशनिहाय पाणी उपलब्धतेचा विचार केला, तर क्षेत्रफळाच्या तुलनेत मराठवाड्याला मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. मराठवाड्याचे क्षेत्रफळ महाराष्ट्राच्या सुमारे २७ टक्के असताना पाण्याचा वाटा केवळ सुमारे ८ टक्के असल्याचे विविध अभ्यासांतून अधोरेखित झाले आहे. पश्चिम महाराष्ट्राचे क्षेत्रफळ सुमारे ४६ टक्के असताना पाण्याचा वाटा ७४ टक्के, तर विदर्भाचे क्षेत्रफळ सुमारे २७ टक्के असताना पाण्याचा वाटा १८ टक्के आहे. साधारणपणे प्रति हेक्टर ३,००० घनमीटर पाण्याची उपलब्धता आवश्यक असताना मराठवाड्यात ती सुमारे १,६८८ घनमीटर प्रति हेक्टर इतकी आहे. त्याचप्रमाणे प्रति व्यक्ती सुमारे १,७०० घनमीटर पाणी अपेक्षित असताना मराठवाड्यात ही उपलब्धता केवळ सुमारे ४३८ घनमीटर आहे.

मराठवाड्याचे सध्याचे सिंचन क्षेत्र केवळ सुमारे २० टक्क्यांच्या आसपास आहे. बहुतांश शेती पावसावर अवलंबून आहे. सुमारे ७० टक्के भूभाग दुष्काळप्रवण असून, रंगनाथन समितीच्या संदर्भानुसार ७६ पैकी ५३ तालुके अवर्षणप्रवण क्षेत्रात येतात. मराठवाड्यातील सुमारे ८० टक्के शेतकरी अल्पभूधारक आहेत. एकूणच मराठवाडा हा पाण्याची तूट असलेला, दुष्काळग्रस्त आणि विकासाच्या अनुशेषाने ग्रस्त प्रदेश आहे.

आजतागायत झालेला जलसंपत्तीचा विकास

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर विविध आयोग, समित्या आणि शासनाच्या जलविषयक धोरणांतून मराठवाड्यात जलसाठे निर्माण करण्यात आले. आज मराठवाड्यात मोठे 11, मध्यम 75 आणि लघु 791 अशा मिळून 877 शेकडो जलप्रकल्प उभे आहेत. गोदावरी, मांजरा-रेणा आदी नदीखोऱ्यांतील प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणात पाणीसाठा निर्माण झाला आहे. यासोबतच मराठवाड्यातील पाणलोटासाठी उपलब्ध असलेल्या सुमारे ५० लाख हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे २९ लाख हेक्टर क्षेत्रावर एकात्मिक पाणलोट आणि जलसंधारणाची कामे करण्यात आली आहेत. तरीही या सर्व प्रयत्नांचा अपेक्षित परिणाम सिंचन क्षेत्र वाढविण्यात आणि दुष्काळ कायमस्वरूपी दूर करण्यात झालेला दिसत नाही.

समन्यायी पाणीवाटपाचा प्रश्न

२०१९ च्या राज्य एकात्मिक जल आराखड्यानुसार विभागनिहाय असमतोल दूर करून उपलब्ध पाण्याचे समन्यायी तत्त्वावर वाटप होणे आवश्यक आहे. जायकवाडीच्या उर्ध्वभागासाठी ११५ टीएमसी पाणी साठवण्यास परवानगी असताना त्यापेक्षा अतिरिक्त साठवण क्षमता निर्माण झाल्याचा मुद्दा सातत्याने उपस्थित केला जात आहे. याचा थेट परिणाम जायकवाडी धरणाच्या पाणीसाठ्यावर होतो. समन्यायी तत्त्वानुसार दरवर्षी ऑक्टोबरअखेर जायकवाडी धरणात ६५ टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा असल्यास संबंधित कायदे, मेंढेगिरी समितीचा अहवाल आणि न्यायालयीन आदेशानुसार उर्ध्वभागातून जायकवाडीत पाणी सोडणे अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्षात यासाठी वेळोवेळी संघर्ष करावा लागतो. मुकणे, वाकी, भावली आदी धरणांतील पाणी इतर भागांसाठी आणि औद्योगिक वापरासाठी आरक्षित करण्याचे निर्णय तसेच नांदूर-मधमेश्वरच्या पाण्याच्या वापराबाबतचे प्रश्न मराठवाड्याच्या दृष्टीने गंभीर आहेत. पाण्याच्या न्याय्य वाटपाशिवाय प्रादेशिक समतोल साध्य होणार नाही.

**सिंचन अनुशेष : सर्वात मोठे आव्हान :** महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या २०२०-२१ च्या अहवालानुसार मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष सुमारे ६.१७ लाख हेक्टर आहे. हा अनुशेष भरून काढण्यासाठी मोठ्या आर्थिक गुंतवणुकीची आवश्यकता आहे. आज मराठवाड्याचे सिंचन क्षेत्र सुमारे २० टक्के, विदर्भाचे सुमारे ३० टक्के, तर पश्चिम महाराष्ट्राचे सुमारे ४० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. चितळे आयोगाच्या अहवालानुसार मराठवाड्याला 260 टीएमसी अतिरिक्त पाण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सिंचन अनुशेष भरून काढणे ही केवळ विकासाची बाब नसून मराठवाड्याच्या भवितव्याचा प्रश्न आहे.

**वितरण व्यवस्था आणि धरणातील गाळ :** जटिल समस्या

मराठवाड्यातील कालवे, वितरिका आणि चाऱ्यांची अवस्था अनेक ठिकाणी दयनीय आहे. धरणात पाणी असूनही योग्य वितरण व्यवस्था नसल्याने ते शेताच्या बांधापर्यंत पोहोचत नाही. परिणामी "दैव देते, पण फाटकी माझी झोळी" अशी मराठवाड्यातील वितरण व्यवस्थेची अवस्था झाली आहे. धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने साठवण क्षमता कमी होत आहे. त्याचबरोबर प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभाव, कालव्यांची दुरवस्था, पाणी वापर संस्थांचे अपुरे बळकटीकरण आणि पाण्याच्या व्यवस्थापनातील त्रुटी यामुळे उपलब्ध पाण्याचा अपेक्षित परिणामकारक वापर होत नाही.

म्हणून केवळ नवीन धरणे बांधणे हा उपाय नसून उपलब्ध पाण्याचे कार्यक्षम व्यवस्थापन, आधुनिक वितरण व्यवस्था, कालव्यांचे सक्षमीकरण आणि पाणी वापर संस्थांचा सहभाग यावरही तितकाच भर देणे आवश्यक आहे.

**राजकीय इच्छाशक्तीची गरज :** मराठवाड्यात सातत्याने गंभीर होत चाललेल्या पाणी प्रश्नाला राजकीय उदासीनताही काही अंशी कारणीभूत आहे. पश्चिमवाहिनी नद्यांचे मराठवाड्याच्या हक्काचे पाणी, समन्यायी पाणीवाटप, वर्षानुवर्षे रखडलेले प्रकल्प आणि वितरण व्यवस्थेतील त्रुटी हे प्रश्न राज्याच्या पातळीवर सातत्याने आणि एकमुखाने मांडणारी राजकीय ताकद अपेक्षेइतकी प्रभावीपणे पुढे आलेली दिसत नाही. पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन संपूर्ण मराठवाड्याच्या पाणी प्रश्नाला न्याय देणारे आणि दीर्घकालीन विकासाची दृष्टी असणारे राजकीय नेतृत्व आज मराठवाड्याला गरजेचे आहे.

**उपाययोजना :** दुष्काळमुक्तीसाठी कालबद्ध कृती आराखडा

मुळात मराठवाडा हा पाण्याची तूट असलेला प्रदेश आहे. ज्या नदीखोऱ्यांमध्ये अतिरिक्त पाणी उपलब्ध आहे, ते पाणी समन्यायी तत्त्वानुसार दुष्काळी मराठवाड्याकडे वळवणे ही काळाची गरज आहे.

- पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी*

महाराष्ट्र राज्य एकात्मिक जलआराखडा शासन निर्णय 23 ऑगस्ट 2019 व 19 सप्टेंबर 2023 नुसार पश्चिम वाहिनी नद्यांचे 168.75 टीएमसी पाणी नदी जोड प्रकल्पद्वारे मराठवाड्याकडे वळवणे अपेक्षित आहे. हा प्रकल्प लालफितीत अडकल्यामुळे आजतागायत एक थेंबही पाणी मिळू शकले नाही.

**कृष्णा मराठवाडा प्रकल्प :** कृष्णा मराठवाडा प्रकल्पांतर्गत मा .विलासरावजी देशमुख मुख्यमंत्री असताना 2005 साली 23 टीएमसी पाणी मराठवाड्याला मंजूर झाले होते. व कोल्हापूर सांगली चे पुराचे अतिरिक्त 30 टीएमसी पाणी मराठवाड्याला उजनीद्वारे मराठवाड्याला मिळावे हा 2024 चा निर्णय दोन्ही कागदावरचा असून, फक्त सात टीएमसी करिता प्रत्यक्षात काम चालू आहे .

**विदर्भातील अतिरिक्त पाणी :** विदर्भात नैसर्गिक नियमानुसार 71 टीएमसी पाणी अतिरिक्त आहे .यातील 32 टीएमसी पाणी येलदरी व पैनगंगा धरणात वळवून हे पाणी दुष्काळी मराठवाड्यातील हिंगोली व नांदेड जिल्ह्यांना याचा फायदा होणार आहे .

**मिशन मोडवर एकात्मिक पाणलोट विकास :** ज्या क्षेत्राला मोठ्या धरणांच्या लाभक्षेत्राचा फायदा होणार नाही, अशा वर्षानुवर्षे सिंचनापासून वंचित भागासाठी संरक्षित सिंचन उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी मराठवाड्यात मिशन मोडवर मोठ्या प्रमाणात एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्याची गरज आहे.

- आधुनिक वितरण व्यवस्था आणि विकेंद्रीकृत जलव्यवस्थापन

अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे, कालवे व वितरिका दुरुस्त करणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे, पाणी वापर संस्थांना सक्षम करणे आणि पाणलोटाच्या माध्यमातून विकेंद्रीकृत जलव्यवस्थापन उभे करणे आवश्यक आहे.

यासोबतच उपलब्ध पाण्यानुसार पीकपद्धती, ठिबक व तुषार सिंचन, पाण्याचा कार्यक्षम वापर आणि भूजल पुनर्भरण यांना प्राधान्य दिले पाहिजे.

लोकचळवळीशिवाय हा प्रश्न सुटणार नाही

यापुढे मराठवाड्यातील जनतेची दुष्काळ सहन करण्याची क्षमता संपत चालली आहे. पाण्याअभावी शेती परवडत नाही, रोजगाराच्या संधी कमी आहेत आणि मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत आहे. या परिस्थितीचा सामाजिक आणि आर्थिक परिणाम व्यापक आहे. मराठवाड्याच्या न्याय्य हक्काच्या पाण्यासाठी समाजातील सर्व स्तरांतील जनतेच्या सहभागातून सजग, प्रगल्भ, सामाजिकदृष्ट्या जबाबदार आणि लोकाभिमुख जलजनचळवळ उभी करण्याची गरज आहे.मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेऊन मराठवाड्याचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी सर्वसमावेशक आणि कालबद्ध कृती आराखडा जाहीर करावा. अंतरखोरे पाणीवहन, समन्यायी पाणीवाटप, अपूर्ण प्रकल्पांची पूर्तता, आधुनिक वितरण व्यवस्था, पाणलोटाच्या माध्यमातून विकेंद्रीकृत जलव्यवस्थापन, उपलब्ध पाण्यानुसार पीकपद्धती आणि पाण्याचा कार्यक्षम वापर या सर्व बाबींचा समन्वय साधून कार्यक्रम राबविला, तर दुष्काळमुक्त मराठवाडा हे स्वप्न नक्कीच साकार होऊ शकते.

आज गरज आहे ती केवळ आश्वासनांची नाही, तर ठोस निर्णयांची, प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची आणि कालबद्ध अंमलबजावणीची.

दुष्काळमुक्त मराठवाडा ही घोषणा नव्हे, तर मराठवाड्याचा हक्क आहे!

**- नरहरी शिवपुरे**
**अध्यक्ष, मराठवाडा पाणी परिषद**

## थोर स्वातंत्र्य सेनानी कै.बाबुरावजी काळे यांचे मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यातील योगदान



देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी भारतात 565 संस्थांना पैकी 3 संस्थाने भारतात विलीन झाली नव्हती त्यात काश्मीर,जुनागड, व हैद्राबाद याचा समावेश होता. इ.स.1724.मध्ये हैद्राबाद संस्थान मीर कमरुद्दीन यांनी स्थापन केले होते.मराठवाडा प्रदेश हा हैद्राबादसंस्थानात होता. सातव्या निजामाच्या काळात मराठवाड्यातील हिंदूंवर अन्याय अत्याचार मोठ्या प्रमाणात वाढले होते. हैद्राबाद येथील निजामाच्या जुलमी अत्याचारी जोखडातून बाहेर पडण्यासाठी येथील जनतेने एकसंघ होऊन" मराठवाडा मुक्ती संग्राम लढा"उभारण्यात आला होता. हा लढा म्हणजे "जुलमी रझाकारी" राजवटी विरुद्ध सामान्य जनतेने केलेला हा उठाव होता. भारतीय स्वातंत्र्यानंतर हैद्राबाद संस्थान भारतात विलीन व्हावे ही येथील जनतेची मागणी होती.मात्र निजामाच्या महत्वकांक्षी धोरणामुळे हैद्राबाद संस्थानाचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण झाले नाही.उलट आपल्या संस्थानाला स्वतंत्र दर्जा मिळावा या उद्देशाने निजामाने "राझाकारी" संघटनेला हाताशी धरून मराठवाड्यातील जनतेवर अन्याय अत्याचार सुरू केले त्यात हिंदूची घरे लुटणे, स्त्रियावर अत्याचार करणे,जनतेच्या मालमत्ता लुटणे, या घटना दिवसेंनदिवसवाढत होत्या या अन्याय अत्याचाराविरुद्ध स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली कै. बाबुरावजी काळे, गोविंदभाई श्रॉफ, आ कृ वाघमारे,बाबासाहेब परांजपे, माणिकचंद पहाडे, दगडाबाई शेळके,काशिनाथ कुलकर्णी,यांनी मराठवाड्याच्या ग्रामीण भागातील तरुणाला संघटित करण्याचे काम केले.या कामात औरंगाबाद जिल्यातील स्वातंत्र्यसैनिकाचे योगदान मोठे होते. कै.बाबुराजी काळे यांनी मराठवाड्यातील तरुणाला संघटीत करण्याचे काम केले. ग्रामीण भागात गुप्त बैठका घेउन ,निजामाविरुद्ध पत्रक वाटणे, भूमिगत राहून निजामा विरुद्ध संघर्षकरून मराठवाड्यातील जनतेला स्वाभिमानाचे धडे दिले.त्यातून तरुणाची मोठी फळी निर्माण झाली इ.स 1938 पासून वंदेमातरम चळवळ उभी करण्यासाठी त्यांनी कार्य केले. शेंदुर्णी कॅम्प जवळील सोयगाव, अजिंठा परिसरातील फर्दापूर आमखेडा, जरंडी, बनोटी, गलवाडा, पळसखेडा ,कवली, घोसला, गोंदेगाव, दस्तपूर, वनगाव, सावरखेडा, वाकडी या गावातील स्वातंत्र्य सैनिकाना एकत्र करून सामान्य जनतेला मराठवाडा मुक्तिसंग्राम आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले, यात जरांडीचे विश्वनाथ राजहंस ,रामराव व्यंकटेश, शामू पाटील झेंडू मोतीराम, फर्दापूरचे यादव बलांडे, तुकाराम वाघ, नामदेव वाघ, दगडू बलांडे, गोविंद साबळे, हिरालाल जैस्वाल, सांडू बलांडे, तुळशीराम बालांडे , सोयगाव येथील हॉनसिंग हजारी, कान्हया बाबूशीह हजारी, लक्ष्मण पवार, पंढरीनाथ देसाई, भुजंग बाळा जाधव, विश्वनाथ सोनार,नामदेव गणपत जाधव, काशिनाथ सोनार, हरीराम तेली, नामदेव क्षीरसागर, लक्ष्मण श्रीवास्तव ,तुळशीराम सोनार, सोमनाथ झंवर,, कवलीचे हरिभाऊ गोडबोले, सावरखेडा येथील अच्युतराव काकडे, घोसला येथील नाथू लोहार, लालचंद जैन, रामजी सोनवणे, तुळशीराम रामजी,मोतीराम सोनाजी, गलवाडा येथील शिवराव देशमुख,नामदेव पाटील, नारायण देशमुख, पंढरी वाघमारे, तुकाराम पाटील, पांडुरंग कोळी, पळसखेड चे शिवशीह शेवगण ,शेउखाडू सिंह परदेशी, रामसिंग परदेशी,हरचंद परदेशी, दलशिंग परदेशी, जुगराम दलचंद, गोंदेगाव येथील कृष्णा पवार,झीपरू महापुरे, त्र्यंबक नांनकर , दामा निकम,रामदास येवले,त्र्यंबक महादु , दस्तपूर चे उमराव चंदेल, वाकडीचे श्यामराव निकम, सोयगाव तालुक्यातील जवळपास 59 स्वातंत्र्य सैनिकांना सोबत घेऊन निजाम राजवटीविरूद्ध गावा गावात गुप्त बैठका घेऊन सामान्य जनतेला एकत्र करून मराठवाड्यातील भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांना अन्नधान्ये पुरविणे, स्वातंत्र्य सैनिकांना गुप्त ठिकाणी आश्रय देणे,त्यांना हत्यारे पुरवणे, गावठी हत्यारे तयार करण्यासाठी आर्थिक मदत करणे विविध,रसद पोहचविण्याचे काम करीत असताना कै.बाबुराजी काळे यांना निजामाच्या सैनिकांनी पकडले. व हर्सूल जेल मध्ये राजकीय कैदी म्हणून त्यांना आपल्या साथीदारां सोबत कारागृहात ठेवण्यात आले, कै. बाबुरावजी काळे, व लक्ष्मणीनारायण जैस्वाल, यांनी अत्यंत शिताफीने हर्सूल कारागृह फोडून तेथून बाहेर पडले व वंदेमातरम च्या घोषणा देत पुन्हा आंदोलनात सहभागी झाले. गावागावांतील सैनिकानी निजामाच्या विरुद्ध मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात बंड केले. या कार्यात कै. बाबुराजी काळे यांनी आपल्या विश्वासू सहकाऱ्यांना सोबत घेतले ,त्यात होनशिंग हजारी, गंगाराम मानकर, भिकाजी पाटील, यांनी भूमिगत राहून सैनिकांना अन्नधान्य पुरविणे, हत्यारे पुरवविले तर मराठवाडा मुक्तिसंग्राम आंदोलनातिल सैनिकांना बंदुका चालविण्याचे प्रशिक्षण देण्याचे काम गोविंदभाई श्रॉफ यांनी केले.

**- प्रा.डॉ.भास्कर टेकाळे,पंडित जवाहरलाल महाविद्यालय**
**छत्रपती संभाजीनगर मो.8624952936**

## वाचक पत्रे

### गणेशोत्सव आणि वर्गणी

रविवार, ६ सप्टेंबरच्या 'रविवारची पत्रे'मधील अक्षय उपगडे यांचे विचार वाचले. लोकमान्य टिळक यांनी समाज प्रबोधन, राष्ट्रप्रेम जागृती आणि एकत्रीकरण हा उदात्त हेतू ठेवून गणेशोत्सवाचा आरंभ केला होता. परंतु दुर्दैवाने त्यांचा हेतू आज कुठेतरी मागे पडल्याचे जाणवत आहे. गणेश उत्सवात धांगडधिंगा, डीजेचा कर्णकर्कश आवाज, लेझर लाईट हे सगळे प्रकार प्रचलित झाले आहेत आणि अर्थात जे की समाजाच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक आहेत. टिळकांनी कदाचित स्वप्नातदेखील याची कल्पना केली नसावी. दुसरा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे लोकवर्गणी. जसे पत्रात म्हटल्याप्रमाणे ती लोकवर्गणी कमी, खंडणी जास्त भासू लागते. हे अगदी खरे आहे. खंडणी वसूल करायला आल्यासारखी तरुण मंडळी दारासमोर उभी राहतात आणि तुमच्या आर्थिक आवाक्याबाहेरची वर्गणी घेतली जाते. आज गल्लोगल्ली गणपती बाप्पा विराजमान होत असतात. एका घरातून कमीत कमी तीन ते चार मंडळे वर्गणी घेऊन जातात. बाप्पाच्या विराजमान होण्यास आमचा विरोध नाही. पण प्रत्येक मंडळाला १०००, ५०० वर्गणी देणे हे अनेकांना झेपत नाही. शिवाय आपल्या घरचा गणपती असतोच ना. प्रत्येक मंडळ जबरदस्तीने वर्गणी घेऊन जाते. जर मर्यादित स्वरूपात मंडळे स्थापन झाली तर एका विशिष्ट परिसरासाठी एक मंडळ असे जर झाले तर भक्त पण आनंदाने सहभागी होतील. शासनाने परवानगी देताना या विषयावर चिंतन करायला हवे. एका नगरात तीन, चार मंडळे असतील तर सामान्य जनतेवर आर्थिक ताण पडणारच ना. आमचं एवढंच म्हणणं आहे की, जबरदस्ती करू नका, ऐच्छिक असू द्या आणि एकाच परिसरातील अनेक मंडळांवर मर्यादा घाला; ज्यामुळे तो एक आनंदोत्सव होईल.

**कीर्ती गाडगे**/९९२११९९९२२

■■■

### आयएनएस निपुण : भारतीय लष्कराच्या स्वावलंबनाचे प्रतीक

नुकतेच आयएनएस निपुणच्या सहभागामुळे भारतीय नौदलाची ताकद वाढली आहे. समुद्राच्या पाण्याखाली बचावकार्य करणारी ही दुसरी युद्धनौका ठरली आहे. अथांग समुद्रात सापडलेल्या पाणबुडीपर्यंत पोहोचून तातडीने मदतीचा हात देण्याची भारतीय नौदलाची क्षमता आणखी बळकट झाली आहे. खोल समुद्रातील डायव्हिंग, पाण्याखालील हस्तक्षेप आणि पाणबुडी बचाव कार्यासाठी सिद्ध असलेली आयएनएस निपुण ही निस्तार वर्गातील दुसरी डायव्हिंग सहायक युद्धनौका नौदलाच्या ताफ्यात नुकतीच दाखल झाली आहे.

या नौकेवर सॅच्युरेशन, हवा आणि हेलिऑक्स डायव्हिंगची सुविधा असून पाण्याखालील पाहणी आणि हस्तक्षेपासाठी दूर नियंत्रित यंत्रणा सज्ज आहे. विशेष डायव्हिंग संकुल, नौकेचे स्थान, स्थिर ठेवणाऱ्या यंत्रणेमुळे समुद्रात या नौकेला दीर्घकाळ गुंतागुंतीच्या मोहिमा राबवता येणे शक्य होणार आहे. पाणबुडीमधील तांत्रिक बिघाडामुळे ती समुद्राच्या तळाशी अडकल्यास तिच्या बचावासाठी आयएनएस निपुण महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

या नौकेची निर्मिती भारतीय लष्कराच्या स्वावलंबनाचे प्रतीक मानले जात आहे. नौदल, हिंदुस्थान शिपयार्ड आणि देशातील विविध उद्योगांच्या समन्वयातून ही युद्धनौका उभी राहिली आहे. समुद्रातील चाचण्यांदरम्यान निपुणवरील सर्व यंत्रणांनी अपेक्षेप्रमाणे कामगिरी बजावली आहे. हे देशाच्या तांत्रिक आणि अभियांत्रिकी क्षमतेचे द्योतक आहे. इतर देशांकडून लष्करी सामग्री महागड्या किमतीत विकत घेण्याऐवजी देशातच आपल्या लष्कराचे सामर्थ्य वाढवणारी आवश्यक सामग्री तयार केली गेल्यास त्याचा वेगळाच प्रभाव लष्कराच्या मनोबलावर होत असतो.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

■■■

### गणेशोत्सव...

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील एक महत्त्वाचा आणि लोकप्रिय उत्सव आहे. गणपती बाप्पा हे बुद्धी, ज्ञान आणि शुभकार्याचे प्रतीक मानले जातात. त्यामुळे गणेशोत्सवाला धार्मिक महत्त्वाबरोबरच सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्वही आहे.

गणेशोत्सवाच्या काळात घराघरांत तसेच सार्वजनिक मंडळांमध्ये गणेशमूर्तीची स्थापना केली जाते. लोक एकत्र येऊन पूजा, आरती आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करतात. गणेशोत्सव हा समाजातील लोकांना एकत्र आणणारा उत्सव आहे. विविध जाती, धर्म आणि आर्थिक स्तरातील लोक एकत्र येऊन उत्सवात सहभागी होतात. मंडळांच्या माध्यमातून स्वच्छता अभियान, रक्तदान, आरोग्य शिबिरे, शैक्षणिक उपक्रम आणि सामाजिक जनजागृती असे विविध उपक्रम राबवले जातात. या उत्सवाला सांस्कृतिकदृष्ट्याही विशेष महत्त्व आहे. संगीत, भजन, नाटक, वक्तृत्व, चित्रकला आणि इतर कलांना गणेशोत्सवाच्या माध्यमातून व्यासपीठ मिळते. त्यामुळे नव्या कलाकारांना आपली कला सादर करण्याची संधी मिळते आणि आपली संस्कृती पुढील पिढीपर्यंत पोहोचते. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सण नसून सामाजिक बांधिलकी, सांस्कृतिक जतन आणि राष्ट्रीय एकात्मता यांचा सुंदर संगम आहे. ■

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समूह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## आज सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे साखळी उपोषण

तभा वृत्तसेवा

चाकूर दि. १६ सप्टेंबर : सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देयके व प्रलंबित निवृत्तीविषयक कामे तातडीने निकाली काढावीत, या मागणीसाठी चाकूर पंचायत समितीसमोर लातूर जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन शाखा चाकूर यांच्या वतीने दि.१७ सप्टेंबर २०२६ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी साखळी उपोषण, तर मागण्या मार्गी न लागल्यास २ ऑक्टोबर २०२६ रोजी गांधी जयंतीदिनी आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या हक्काच्या देयकांसाठी वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न प्रलंबित राहिल्याचा आरोप दि. ०१ सप्टेंबर २०२६ रोजी दिलेल्या निवेदनातून करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतन, भविष्य निर्वाह निधी, उपदान (ग्रॅच्युइटी), रजा रोखीकरण, वेतन फरक तसेच इतर शासनमान्य लाभांशी संबंधित प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रलंबित कामांमुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



# विविध वृत्त.....

## मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त पालकमंत्री यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १६ सप्टेंबर : मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त आज गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता हुतात्मा स्मारक स्मृतीस्तंभ येथे राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन होणार आहे. तत्पूर्वी हुतात्मा स्मारक स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण केले जाईल व मानवंदना दिली जाईल.

समारंभासाठी निमंत्रितांनी राष्ट्रीय पोषाखात समारंभ सुरु होण्यापूर्वी १५ मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. या मुख्य शासकीय समारंभास सर्वांना उपस्थित राहता यावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

## प्राचार्य चंद्रशेखर भोगडे सर यांचे निधन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ सप्टेंबर : दि मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे सदस्य तथा येथील बसवण्णाअप्पा वाले न्यू इंग्लिश मीडियम स्कूलचे आदरणीय प्राचार्य श्री. चंद्रशेखर चनबसप्पा भोगडे सर (वय ७९ वर्षे) यांचे मंगळवार, दिनांक १५ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता त्यांच्या लातूर येथील राहत्या घरी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या अचानक जाण्याने लातूरच्या शिक्षण क्षेत्रासह संपूर्ण शिक्षण जगतात आणि शालेय परिवारात मोठी शोककळा पसरली आहे.

कै. प्रा. चंद्रशेखर भोगडे सर हे एक कडक शिस्तीचे, कर्तव्यदक्ष आणि अत्यंत प्रेमळ मार्गदर्शक म्हणून ओळखले जात होते. दि मॉडर्न एज्युकेशन सोसायटी आणि बसवणप्पा वाले न्यू इंग्लिश मिडीयम स्कूलच्या जडणघडणीत त्यांचे मोलाचे योगदान होते. त्यांच्या पश्र्चात त्यांची पत्नी, एक मुलगी, मुलगा, सून आणि नातवंडे, तसेच त्याचा लहान भाऊ आणि त्यांचा संपूर्ण परिवार, असा मोठा आप्तपरिवार आहे.

## श्वान पथकात 'शक्ती 'चे आगमन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ सप्टेंबर : लातूर पोलीस दलाच्या श्वान पथकाच्या क्षमतेत आणखी एक भर पडली असून, बेल्जियन मॅलिनॉइस जातीचा 'शक्ती' हा श्र्वान दाखल झाला आहे. श्र्वान पथकाची स्थापना सन २००७ मध्ये झाल्यापासून प्रथमच या जातीचा श्र्वान पथकात दाखल झाला आहे. स्फोटक पदार्थांचा शोध घेण्यासाठी 'शक्ती'ला विशेष प्रशिक्षण देण्यात येणार असून, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर तो सुरक्षा व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

लातूर पोलीस दलात दाखल झालेल्या या श्र्वानचे नाव पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी 'शक्ती' असे ठेवले. श्र्वान पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक कुलकर्णी, तसेच 'शक्ती'चे हँडलर पोलीस अंमलदार प्रदीप भालेकर आणि संजय जगताप यांनी 'शक्ती'ला पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्यासमोर हजर केले. यावेळी पोलीस अधीक्षकांनी त्याचे 'शक्ती' असे नामकरण केले. गणेशोत्सव, सार्वजनिक सभा, महत्त्वाचे कार्यक्रम, व्हीआयपी दौरे, गर्दीची ठिकाणे तसेच संवेदनशील ठिकाणी सुरक्षा तपासणी करताना त्याची मदत घेतली जाऊ शकते.

# जागा बळकावण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कारवाईसाठी पालकमंत्री - मुख्यमंत्र्यांनाही भेटणार : मणियार

## प्लॉटवर अवैध कब्जा करणाऱ्या ९ जणांविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ सप्टेंबर : लातूर शहर परिसरात जमीन, प्लॉटवर अवैधरित्या कब्जा करून त्या जमिनी इतरांना विक्री करण्याचा प्रयत्न होत आहे. आपल्याच भावाच्या पाखरसांगवी परिसरातील प्लॉटवर असा प्रयत्न झाला असून या प्रकरणी ९ आरोपींविरुद्ध एमआयडीसी पोलिसात गुन्हा दाखल झाला असल्याची माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष राजा मणियार यांनी बुधवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना दिली. प्लॉटचे कंपाउंड तोडून जबरदस्तीने वॉचमनला मारहाण करून हा गंभीर प्रकार घडल्याने यावरून आता लातूरमध्ये लॉट घेणे सामान्यांसाठी जिकिरीचे बनल्याचे दिसून येत असल्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली.

अब्दुल गफार बद्दल रशीद मणियार यांच्या मालकीचे सहा प्लॉट पाखरसांगवी येथील गट क्रमांक ७७ मध्ये आहेत. या प्लॉटवर हाफिज शेख, रहेमतुल्ला शेख, बशीर शेख, विजय मस्के, सचिन देशमुख, गोपाळ लवटे, सतीश मानकुसकर यांनी कब्जा करण्याचा प्रयत्न केला. या मंडळींनी बनावट खरेदीखताद्वारे मौजे वरवंटी ता. लातूर येथील गट क्रं . ८५ च्या सातबाराच्या आधारे खोट्या व पाखरसांगवी मधील जमीन गट क्रं . ७७ चतुःसिमा भासवून ही जमीन गुंड प्रवृत्तीच्या मंडळींना विक्री केल्याची तक्रार एमआयडीसी पोलिसात दिली आहे. याप्रकरणी पोलिसांनी ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तरीही या मंडळींकडून आपल्याला व आपल्या परिवाराला धोका असल्याची भीती राजा मणियार यांनी व्यक्त केली. आरोपींनी प्लॉटवरील सीसीटीव्ही कॅमेरे फोडले असून तेथील साहित्यही लंपास केले आहे. हा प्रकार गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी घडला असून याबाबत आपण आ. जयंतराव पाटील यांच्याशी अगदोर बोललो. आ. पाटील यांनी लातूरचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या कानावर हा विषय घातला. त्यानंतर आपण पोलीस अधीक्षकांशी बोललो, तेव्हा त्यांनी याप्रकरणी तुमच्या प्लॉटवर कोणी कब्जा करणार नाही,असा शब्द दिला. याविषयी पोलिसात गुन्हाही नोंद केला गेला आहे. यापूर्वीही अनेकदा या प्लॉटवर अनधिकृतपणे कब्जा करण्याचा प्रयत्न झाला आहे. यावेळचा प्रकार नेहमीपेक्षा भीषण होता. याप्रकरणी आपल्यावर खोटी अट्रॉसिटी दाखल होऊ शकते, आपल्यावर विनयभंगाची खोटी तक्रारही दाखल केली जाऊ शकते, अशी भीती व्यक्त करून राजा मणियार यांनी मागच्या चाळीस वर्षांपासून लातूरचे राजकारण करत असताना आपण सामान्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला असल्याचे सांगितले.

लातुरात कोणाच्याही जागा, प्लॉटवर ठरवून जबरदस्तीने ताबा मिळवण्याचा प्रयत्न काही मंडळींकडून केला जात आहे. असा प्रकार कोणाच्याही बाबतीत घडला असेल तर संबंधितांनी कृपया योग्य त्या दस्तऐवजांसह आपल्याशी संपर्क साधावा. सामान्य लातूरकरांसाठी आपण ही लढाई लढणार असून येत्या हिवाळी अधिवेशनात माजी गृहमंत्री आ. जयंतराव पाटील, आ. रोहित पवार, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रवक्ते महेबूब शेख यांच्या मार्गदर्शनाखाली विधिमंडळात आवाज उठविण्यासाठी आग्रही विनंती करण्यात येणार आहे. आपण लोकशाही मार्गाने न्याय मिळविण्यासाठी पालकमंत्री , मुख्यमंत्र्यांचीही भेट घेऊन हे प्रकरण त्यांच्याही कानावर घालणार आहोत. आपला प्लॉट बळकावण्याचा प्रयत्न करणाऱ्यांमागे कोण आहेत ? याचा शोध गृहखात्याने घ्यावा,अशी आपली आग्रही मागणी असल्याचेही राजा मणियार यांनी सांगितले. याप्रसंगी आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी गफार मणियार, शेळके, सिद्धेश्र्वर बिराजदार, प्रवीण साळुंके, चंद्रशेखर कत्ते, निशांत वाघमारे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## उदगीरच्या इनलाईफ फिटनेसचा संभाजीनगरमध्ये गौरव! 'श्रेष्ठ फिटनेस ब्रँड अवॉर्ड २०२६'ने राधाकिशन डोंगरे सन्मानित




तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १६ सप्टेंबर : फिटनेस क्षेत्रात आपल्या उत्कृष्ट कार्याचा ठसा उमटविणाऱ्या इनलाईफ फिटनेस, उदगीरचा प्रतिष्ठित 'श्रेष्ठ फिटनेस ब्रँड अवॉर्ड २०२६' देऊन गौरव करण्यात आला. संभाजीनगर येथे झालेल्या विशेष पुरस्कार सोहळ्यात हा सन्मान सुप्रसिद्ध अभिनेत्री व गायिका वर्षा उसगावकर यांच्या हस्ते इनलाईफ फिटनेसचे संस्थापक राधाकिशन डोंगरे यांना प्रदान करण्यात आला.

इनलाईफ फिटनेसच्या माध्यमातून दर्जेदार फिटनेस सुविधा, आधुनिक व्यायाम उपकरणे, प्रशिक्षित मार्गदर्शन आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला.

उदगीरसारख्या शहरातून सुरू झालेल्या इनलाईफ फिटनेसला मिळालेला हा सन्मान स्थानिक फिटनेस क्षेत्रासाठीही अभिमानाची बाब मानली जात आहे. पुरस्कार स्वीकारताना राधाकिशन डोंगरे यांनी हा सन्मान इनलाईफ फिटनेसच्या संपूर्ण टीमला आणि त्यांच्या सदस्यांना समर्पित केला. हा पुरस्कार म्हणजे आमच्या मेहनतीची पोचपावती असून, यापुढे आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा आहे. फिटनेस ही केवळ शरीराची नव्हे, तर निरोगी समाजाची गरज आहे, असे राधाकिशन डोंगरे यांनी सांगितले.

## पालकमंत्र्यांच्या भुमिकेकडे भादेकरांचे लक्ष

# मंजूरी कन्या शाळेची अन् घाट जिल्हा परिषद शाळेचा




तभा वृत्तसेवा /सुधीर गंगणे

औसा दि.१६ सप्टेंबर - औसा तालुक्यातील भादा येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या बांधकामासाठी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत ९० लाख रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला.यानंतर प्रशासनातील कांहीं मंडळींनी या कामात गावकऱ्यांना अंधारात ठेवून तांत्रिक खोडा घातला आहे.ज्या कामासाठी निधी मंजूर झाला तेच काम बाजूला ठेवून दुसऱ्या शाळेच्या उभारणीसाठी हेच प्रशासन कामाला लागले आहे.या कामाला दोन एकर जागा दान दिलेल्या गावकऱ्यांचा विरोध असून याच्या विरोधात गेल्या दोन दिवसांपासून आमरण उपोषण सुरू आहे.याच काळात मराठवाडा मुक्ती संग्रामदिनाचे औचित्य साधून लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले लातूर येथे येत आहेत.यांमुळे पालकमंत्र्यांच्या भुमिकेकडे भादेकरांचे लक्ष लागले आहे.

गेल्या २५-३० वर्षांपासून जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा सुरू आहे.या शाळेच्या उभारणीसाठी गावातील ४०-४५ गावकऱ्यांनी दोन एकर जागा दान देवून शाळेच्या नावाने करून दिली.आ. रमेश कराड यांनी ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाची सोय आणि पालकांची अग्रीम मागणी लक्षात घेऊन या शाळेच्या इमारतीच्या बांधकामासाठी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत ९० लाख रूपयांचा निधी मंजूर करून देण्यात सिंहाचा वाटा उचलला.या कन्या शाळेच्या इमारतीच्या बांधकामासाठी गुत्तेदाराला काम देण्यात आले असून यासाठी लागणारी कागदपत्रांची प्रक्रिया पुर्ण झाली आहे.

कन्या प्रशालेच्या इमारतीचे बांधकाम सुरू होणे गरजेचे असताना सुस्थितीत असलेल्या जिल्हा परिषद शाळेची इमारत लागणारी परवानगी न घेताच पाडली आहे. आणि कन्या शाळेचा मंजूर निधी जिल्हा परिषद शाळेसाठी वापरण्याचे षडयंत्र होत आहे.चांगल्या सुस्थितीत असलेल्या वर्ग खोल्या पाडताना विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पर्यायी व्यवस्था केली नाही.तसेच विनापरवाना शाळेच्या शिक्षणाचे वेळापत्रक बदलून टाकले.या राजकीय ढंगात होत असलेल्या प्रकरणाची जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.यानंतर यांनी मंगळवार दि.१५ पासून आमरण उपोषणास सुरुवात केली आहे.

पहिल्या दिवशी तालुका शिक्षण विस्तार अधिकारी, शिक्षण केंद्र प्रमुख व सहाय्यक केंद्र प्रमुख यांनी उपोषण स्थळी राम पाटील यांची भेट घेऊन मागण्या जाणून घेऊन कन्या शाळेसाठी नागरिकांनी जी जागा दान दिली त्याची पाहणी केली. यावेळी नागरिकांनी शाळा एकत्रिकरणाला विरोध दर्शविला आहे. दुसऱ्या दिवशी औसा गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते यांनी उपोषण स्थळी भेट दिली. पालकांच्या भावना व मागण्या जाणून घेत दीड तास चर्चा केली. यावेळी उपस्थित नागरिकांनी कन्या माध्यमिक शाळा स्वतंत्र रहावी.अशी मागणी केली.

याचबरोबर मुख्याध्यापक यांची सक्षम वर्ग खोल्या पाडताना,शाळेचे वेळापत्रक बदलतानाच्या गोलमाल भुमिकांची यावेळी चर्चा करण्यात आली.गटशिक्षणाधिकाऱ्यांनी वरिष्ठांना आपल्या भावना कळवून माझे कर्तव्य पार पाडेन.असे आश्र्वासन उपोषण कर्त्यांना दिले.गेल्या दोन दिवसांत दोन वेळा संबंधित अधिकाऱ्यांनी उपोषण कर्त्यांची भेट घेतली मात्र अद्याप कोणतीही भुमिका स्पष्ट केली नाही.यामुळे उपोषण अजून किती दिवस सुरू राहणार?की प्रशासन या प्रकरणी पुन्हा एकदा वेळ ढकलीतच नेणार..? का पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले जिल्हा नियोजन समितीकडून मंजूर झालेले काम तात्काळ सुरू करण्याचे आदेश देऊन या प्रकरणाला पुर्णविराम देणार ...! याकडे भादेकरांसह तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# जिल्ह्यातील प्रत्येक पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ द्यावा : खासदार डॉ. काळगे



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १६ सप्टेंबर : जिल्ह्यातील प्रत्येक पात्र लाभार्थ्याला घरकुलाचा लाभ मिळावा यासाठी योग्य नियोजन करावे आणि घरकुलाचे अनुदान कोणत्याही विलंबाशिवाय दिले जाईल यासाठी प्रशासनाने विशेष प्रयत्न करावेत, अशा सूचना जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीचे (दिशा) अध्यक्ष तथा खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी दिल्या. त्यांच्या अध्यक्षतेखाली आज दिशा समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात झाली.

या बैठकीला जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष उषाताई पाटील, आमदार तथा मुख्य प्रतोद विक्रम काळे, आमदार अमित विलासराव देशमुख, महापौर जयश्री सोनकांबळे, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहूल कुलकर्णी यांच्यासह विविध पदाधिकारी, अशासकीय सदस्य व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमांतर्गत योजनांच्या लाभार्थी वयोवृद्ध व्यक्तींच्या आधार प्रमाणीकरणाच्या कामात येत असलेल्या अडचणी तातडीने दूर करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, असेही खासदार डॉ. काळगे यांनी सांगितले. सध्या पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असल्याने कृषी विभागाने तत्काळ अहवाल तयार करून शासनाकडे पाठवावा आणि पीक कापणी प्रयोग काळजीपूर्वक करून नुकसानीची अचूक नोंद करावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. जिल्हा परिषद शाळांमधील स्वच्छतागृहांच्या दुरुस्तीची कामे प्राधान्याने हाती घेण्यात यावीत, तसेच पोषण आहाराच्या बाबतीत सर्व आवश्यक निकष काटेकोरपणे पाळले जावेत, असेही त्यांनी सांगितले.

यावर्षी जिल्ह्यातील एकही गाव स्मशानभूमीविना राहू नये, यासाठी व्ही. बी. जी. राम जी आणि जिल्हा वार्षिक योजनेतून कामे पूर्ण करण्याचे नियोजन करावे, अशा सूचना आमदार विक्रम काळे यांनी यावेळी दिल्या. तसेच शहरी व ग्रामीण भागात एकही अंगणवाडी इमारतीविना राहू नये आणि सर्व अंगणवाड्यांना स्वतःची इमारत मिळावी, यासाठी जिथे जागा उपलब्ध नाही तिथे ती उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत. कारण हा बालकांच्या शिक्षण व पोषणाचा अत्यंत महत्त्वाचा विषय असल्याचे त्यांनी सांगितले. आमदार अमित देशमुख यांनी लातूर शहर भुयारी गटार योजनेची कामे गुणवत्तापूर्ण व गतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. भुयारी गटाराच्या कामासाठी खोदलेल्या रस्त्यांची वेळेत दुरुस्ती न झाल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याने हे रस्ते तातडीने दुरुस्त करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या. आगामी टंचाईची परिस्थिती लक्षात घेता प्रत्येक गावात व्ही. बी. जी. राम जी योजनेतून किमान एकतरी काम सुरू करावे, असे त्यांनी सांगितले. लातूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मांजरा धरणातील उपलब्ध पाणीसाठा लक्षात घेता अवैध पाणी उपसा रोखणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी महानगरपालिका, महसूल आणि पोलिस विभागाने संयुक्त पथक स्थापन करून आवश्यक कार्यवाही करावी, अशा त्यांनी दिल्या. प्रारंभी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक संजय इंगळे यांनी प्रास्ताविक केले. या बैठकीत केंद्र शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. लोकप्रतिनिधी, अशासकीय सदस्य यांनीही यावेळी आपल्या सूचना मांडल्या. तसेच योजनांच्या अंमलबजावणीविषयी संबंधित शासकीय विभाग प्रमुखांनी माहिती दिली. सूत्रसंचालन जिल्हा अभियान व्यवस्थापक देवकुमार कांबळे यांनी केले.

## कुणबी जात प्रमाणपत्रासाठी विशेष मोहीम

### १० ते १५ सप्टेंबरदरम्यान ४६ शिबिरांमध्ये २३२ अर्ज प्राप्त

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १५ सप्टेंबर : जिल्ह्यातील पात्र नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्र वितरणासाठी लातूर जिल्हा प्रशासनाच्यावतीने १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील प्रत्येक महसूल मंडळ स्तरावर संबंधित तलाठी, ग्रामसेवक आणि मंडळ अधिकारी यांच्या संयुक्त पथकाद्वारे विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष मोहिमेअंतर्गत १० ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत संपूर्ण जिल्हाभरात एकूण ४६ शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांकडून कुणबी प्रमाणपत्रासाठी एकूण २३२ अर्ज प्राप्त झाले आहेत.

लातूर तालुक्यात १२ शिबिरे पार पडली असून त्यात सर्वाधिक १७४ अर्ज प्राप्त झाले आहेत. औसा व रेणापूर तालुक्यांत मिळून एकूण ७ शिबिरे घेण्यात आली, ज्यात २० अर्ज प्राप्त झाले असून २ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. औसा तालुक्यात ४ शिबिरांमध्ये ६ अर्ज प्राप्त झाले, ज्यापैकी १ अर्ज मंजूर झाला असून २ प्रकरणांत वंशावळ जुळविणे आणि ३ प्रकरणांत घरातील उर्दू दस्तऐवजांची पडताळणी करणे बाकी असल्याने ५ अर्ज प्रलंबित आहेत. रेणापूर तालुक्यात ३ शिबिरांमध्ये १४ अर्ज प्राप्त झाले, ज्यापैकी १ अर्ज मंजूर झाला असून १३ अर्ज छाननीसाठी वंशावळ समितीकडे पाठवण्यात आले आहेत. निलंगा उपविभागात एकूण १३ शिबिरांचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये निलंगा तालुक्यात ४ शिबिरांत ३३ अर्ज प्राप्त झाले. जळकोट तालुक्यातील २ शिबिरांमध्ये ५ अर्ज प्राप्त आहेत. जिल्हा प्रशासनामार्फत १७ सप्टेंबर २०२६ पर्यंत ही शिबिर मोहीम सातत्याने राबवली जात आहे.




## 'शेतकरी मेळावा अपडेट

### आर. डी. देशमुख यांच्या स्मृती अंकाचे उद्या प्रकाशन : मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त श्री शिवाजी महाविद्यालयात कार्यक्रम

**परभणी,/प्रतिनिधी :** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त मराठवाडा मुक्ती संग्राम दिन याचिकाकार आर. डी. देशमुख (आण्णा) यांच्या स्मृती अंकाचा प्रकाशन सोहळा बुधवार १७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. राज्यमंत्री तथा परभणीच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते स्मृती अंकाचे प्रकाशन होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी राज्यमंत्री सुरेशराव वरपुडकर तर प्रमुख पाहुणे म्हणून खासदार संजय (बंडू) जाधव, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा पोलीस अधीक्षक पंकजकुमार कुमावत व महापालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांची उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमात वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. वेदप्रकाश पाटील, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्थेचे विश्वस्त डॉ. शिरीष खेडगीकर, नाशिकचे भैय्यासाहेब कोठावळे, ज्येष्ठ पत्रकार ज्ञानदेव पायगव्हाणे (जालना) आणि सेवानिवृत्त प्राचार्य के. के. पाटील (परभणी) हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत.

मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या इतिहासातील आर. डी. देशमुख यांच्या योगदानाचे स्मरण आणि त्यांच्या कार्याचा परिचय नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या स्मृती अंकाचे प्रकाशन करण्यात येत आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक ॲड. जी. आर. देशमुख, सुभाषदादा जावळे, श्रीधर देशमुख, रामेश्वर शिंदे, उदय वाईकर, सुनील जाधव, ॲड. सुजित देशमुख, स्मित देशमुख, मयूर देशमुख आणि मो. इलियास कच्छी यांनी केले आहे.

### पावसाअभावी लिंबाळा परिसरातील खरीप पिके संकटात; शेतकऱ्यांकडून तातडीच्या मदतीची मागणी

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील लिंबाळा परिसरात पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील पिकांवर गंभीर संकट ओढवले आहे. पुरेशा पावसाअभावी सोयाबीनची वाढ खुंटली असून अनेक शेतांमध्ये पीक वाळण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. लिंबाळा येथील शेतकरी दिनकर एकनाथराव दराडे यांच्या शेतातील सोयाबीन पिकाची पावसाअभावी मोठ्या प्रमाणात हानी झाली. पीक उत्पादन देण्याच्या स्थितीत नसल्याने त्यांनी बुधवारी (दि.१६) अखेर आपल्या जनावरांना सोयाबीनच्या शेतात सोडले. उत्पादनाऐवजी चारा म्हणून पीक वापरण्याची वेळ आल्याने पावसाअभावी शेतकऱ्यांवर ओढवलेल्या संकटाची तीव्रता स्पष्ट होत आहे. यंदाच्या खरीप हंगामात मोठ्या अपेक्षेने सोयाबीनची पेरणी करण्यात आली होती. मात्र पिकाच्या वाढीच्या महत्त्वाच्या काळात अपेक्षित पाऊस न झाल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला. परिणामी पिकाची वाढ खुंटली असून पाने वाळू लागली आहेत. शेंगा भरण्याच्या प्रक्रियेवरही त्याचा परिणाम झाला आहे. काही शेतांमध्ये उत्पादनातून लागवडीचा खर्चही निघण्याची शक्यता कमी झाली आहे. पेरणीपासून बियाणे, खते, औषध फवारणी, मशागत यासाठी केलेला खर्च पिकाच्या नुकसानीमुळे वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. त्यामुळे लिंबाळा परिसरातील शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. दरम्यान, प्रशासनाने लिंबाळा परिसरातील पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने नुकसानीचे पंचनामे करावेत, बाधित शेतकऱ्यांना पीकविमा व शासकीय मदतीचा लाभ मिळवून द्यावा, तसेच पावसाअभावी निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीचा गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी शेतकरी दिनकर एकनाथराव दराडे यांनी शासनाकडे केली आहे. खरीप हंगाम हातातून जाण्याची शक्यता निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत लवकरात लवकर देण्यात यावी, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

### न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे काळ्या फिती लावून आंदोलन :
#### वेतनश्रेणी व आर्थिक लाभांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे वेधले लक्ष

**परभणी,/प्रतिनिधी :** मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिपत्याखालील दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी परभणी जिल्हा सत्र न्यायालय परिसरात बुधवारी (दि. २६) न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून एकदिवसीय आंदोलन केले. आंदोलनादरम्यान कर्मचाऱ्यांनी नियमित कामकाज सुरू ठेवत शांततेच्या मार्गाने आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. परभणी जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटना गट-क, परभणी स्टेट ज्युडिशियल स्टेनोग्राफर्स असोसिएशन, परभणी डिस्ट्रिक्ट बेलीफ्स असोसिएशन, परभणी जिल्हा न्यायालयीन गट-ड कर्मचारी संघटना यांच्यासह संबंधित पाच संघटनांच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या सुधारित वेतनश्रेणीच्या धर्तीवर दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही आर्थिक लाभ देण्यात यावेत, तसेच 'समान काम, समान वेतन' या तत्त्वानुसार वेतनश्रेणी व वेतनवाढीचा प्रस्ताव शासनाने गांभीर्याने विचारात घेऊन त्याची अंमलबजावणी करावी, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. या मागण्या संविधानाच्या चौकटीत असल्याचेही संघटनांकडून सांगण्यात आले.

न्यायालयीन प्रशासनातील महत्त्वाची जबाबदारी पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतन व सेवाविषयक विविध मागण्या दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याने त्याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलनाचा पहिला टप्पा म्हणून काळ्या फिती लावून कामकाज करण्यात आले. प्रलंबित वेतनवाढ व आर्थिक लाभांबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. दरम्यान, या आंदोलनाला सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी संघटनेनेही पाठिंबा दिला. त्यामुळे विद्यमान तसेच सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी एकत्र येत मागण्यांना समर्थन दर्शविले. शासनाने वेतनश्रेणी, आर्थिक लाभ आणि सेवाविषयक प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. मागण्यांवर योग्य निर्णय न झाल्यास पुढील काळात आंदोलनाची दिशा ठरविण्यात येईल, असे संघटनांच्या वतीने सांगण्यात आले. आंदोलनात अमृत कदम, अनिल दळवी, के. के. जोशी, एस. आर. रगटे, लिंबाजी गरुड, गोपाळ टाक, व्ही. बी. कदम, एन. एस. करवलकर तसेच सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी संघाचे एस. जी. कुलकर्णी, डी. एम. झरीकर, पी. अंदोले, के. एस. ताटे, डी. बी. तिडके, ए. आर. आळनुरे, एल. आर. साबळे, ए. एम. खेडकर, एम. बी. पावगे, के. आर. सिद्दिकी, अख्तर खातून पठाण आदी सहभागी झाले.

# एसटी आरक्षणासाठी बंजारा समाजाचा जिंतूरमध्ये एल्गार

## हजारो समाजबांधवांचा मोर्चात सहभाग; महिलांचीही मोठी उपस्थिती; व्यापाऱ्यांचा दुपारपर्यंत बंदला प्रतिसाद





**जिंतूर,/प्रतिनिधी:-** बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात आरक्षणाचा लाभ मिळावा, या मागणीसाठी बुधवारी जिंतूर शहरात बंजारा समाजाच्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात आला. हजारो समाजबांधवांसह महिलांनीही मोठ्या संख्येने सहभागी होत आरक्षणाच्या मागणीला जोरदार पाठिंबा दिला. आरक्षणाच्या मागणीसह गेल्या काही दिवसांपासून उपोषण करणारे विनोद आडे यांच्या आंदोलनाची शासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्यापासून मोर्चाला सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज चौक, येलदरी कॉर्नर, मेन चौक, पोलिस ठाण्यासमोरून मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला. यावेळी महिला, युवक, ज्येष्ठ नागरिकांसह समाजातील विविध घटक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चामुळे शहरातील प्रमुख मार्गांवर बंजारा समाजाच्या एकजुटीचे चित्र दिसून आले. तहसील कार्यालयात तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. त्यानंतर मोर्चेकरी पुन्हा वसंतराव नाईक पुतळा परिसरात परतले. बंजारा समाजाला एसटी प्रवर्गात आरक्षण मिळावे, या मागणीसाठी विनोद आडे यांनी ५ सप्टेंबरपासून जिंतूर येथे उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या उपोषणाची शासनाने तातडीने दखल घेऊन मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी मोर्चेकऱ्यांनी केली. निवेदनात गोर बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी प्रशासकीय, कायदेशीर व घटनात्मक कार्यवाही तातडीने करण्याची मागणी करण्यात आली. तसेच न्यायमूर्ती तहिलयानी यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या कामकाजाची सद्यस्थिती, अहवाल शासनाला सादर झाला आहे किंवा नाही, तसेच त्यानंतर झालेली कार्यवाही याबाबत अधिकृत माहिती समाजास देण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या समाजबांधवांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची आर्थिक मदत आणि पात्र कुटुंबीयांना शासकीय नोकरी देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली.

व्यापाऱ्यांचा बंद; आंदोलनाला उत्स्फूर्त साथ

बंजारा समाजाच्या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर जिंतूर शहरातील व्यापाऱ्यांनी दुपारपर्यंत आपापली आस्थापने बंद ठेवून आंदोलनाला प्रतिसाद दिला. व्यापाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल बंजारा समाजाच्या आंदोलकांनी व्यापारी बांधवांचे आभार मानले. महिलांची लक्षणीय उपस्थिती एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी काढण्यात आलेल्या मोर्चात महिलांचा लक्षणीय सहभाग राहिला. मोठ्या संख्येने महिला मोर्चात सहभागी झाल्याने आरक्षणाच्या मागणीला व्यापक सामाजिक पाठिंबा असल्याचे चित्र जिंतूरमध्ये पाहायला मिळाले. बारा दिवसांपासून उपोषण एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी विनोद आडे यांनी ५ सप्टेंबरपासून वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरात उपोषण सुरू केले आहे. उपोषणाची तातडीने दखल घेऊन शासनाने आरक्षणाच्या मागणीवर ठोस कार्यवाही करावी, अशी मागणी मोर्चेकऱ्यांनी केली.

## मानवत ग्रामीण रुग्णालयातील गणेशोत्सव देखाव्यातून सार्वजनिक आरोग्य सेवांची माहिती; नागरिकांचे लक्ष

**मानवत,/प्रतिनिधी:** येथील ग्रामीण रुग्णालयात यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त 'आरोग्यदूत गणराया... निरोगी महाराष्ट्राची वाटचाल' या संकल्पनेवर आधारित देखावा साकारण्यात आला आहे. धार्मिक उत्सवाला सामाजिक जनजागृतीची जोड देत या देखाव्यातून सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध योजना, आरोग्य सुविधा आणि रुग्णालयातील उपलब्ध सेवांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली आहे.

देखाव्याच्या मध्यभागी श्री गणरायाची मूर्ती विराजमान असून, त्यांच्या साक्षीने शासनाच्या आरोग्यविषयक योजनांची माहिती आकर्षक पद्धतीने मांडण्यात आली आहे. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, आरोग्यमंत्री आणि आरोग्य राज्यमंत्र्यांची छायाचित्रे तसेच ग्रामीण रुग्णालयातील विविध विभागांची माहिती या देखाव्यात समाविष्ट करण्यात आली आहे. मातृत्व व बाल आरोग्य, महात्मा फुले जनआरोग्य योजना, क्षयरोगमुक्त भारत अभियान, राष्ट्रीय आरोग्य अभियान, असंसर्गजन्य आजार विभाग, आयुष्मान आरोग्य मंदिर, व्यसनमुक्ती अभियान, मानसिक आरोग्य सेवा, रक्तदान व अवयवदान जनजागृती, स्वच्छता व आरोग्य तसेच एकात्मिक सल्ला व समुपदेशन केंद्र आदी योजनांची माहिती या माध्यमातून देण्यात आली आहे.

ग्रामीण रुग्णालयात उपलब्ध असलेल्या विविध सेवांवरही देखाव्यात विशेष भर देण्यात आला आहे. यात १०२ व १०८ आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा, दर मंगळवारी गर्भवती मातांची तपासणी, आवश्यक गर्भवती महिलांसाठी सोनोग्राफी, बालकांचे नियमित लसीकरण, नेत्र तपासणी, मानसिक आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार, क्षयरोग निदान, डिजिटल एक्स-रे व ऑनलाइन रिपोर्ट सेवा, रक्त व लघवीच्या ७६ प्रकारच्या मोफत तपासण्या, जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी तसेच सुमारे २७४ प्रकारच्या औषधांचे मोफत वितरण आदी सेवांची माहिती देण्यात आली आहे. आंतररुग्ण व प्रसूती मातांसाठी उपलब्ध सकस आहार व्यवस्थेची माहितीही यामध्ये देण्यात आली आहे..

## आरोग्यदूत गणरायाच्या साक्षीने जनसेवेचा संदेश

### ग्रामीण रुग्णालय, मानवतचा गणेशोत्सव राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रतिनिधित्व करणारा आकर्षक देखावा



**मानवत,/प्रतिनिधी-** ग्रामीण रुग्णालय, मानवत येथे यावर्षी गणेशोत्सवानिमित्त साकारण्यात आलेला देखावा केवळ धार्मिक उत्सवापुरता मर्यादित न राहता महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जनकल्याणकारी योजनांचे प्रभावी प्रतिनिधित्व करणारा ठरला आहे.

''आरोग्यदूत गणराया... निरोगी महाराष्ट्राची वाटचाल'' या संकल्पनेवर आधारित हा देखावा नागरिकांमध्ये विशेष आकर्षणाचा विषय बनला आहे. देखाव्याच्या मध्यभागी विराजमान असलेल्या श्री गणरायाच्या साक्षीने राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा अभिनव प्रयत्न करण्यात आला आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्यविषयक सुविधा, योजना आणि सेवा यांची सविस्तर माहिती एका ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे. देखाव्यामध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, आरोग्यमंत्री व आरोग्य राज्यमंत्री यांची छायाचित्रे लावून राज्य शासनाच्या आरोग्यविषयक धोरणांचे प्रतिनिधित्व करण्यात आले आहे. तसेच ग्रामीण रुग्णालय, मानवत येथील विविध विभाग आणि सेवांची माहिती आकर्षक पद्धतीने मांडण्यात आली आहे. आरोग्ययोजनांचामाहितीपूर्णआढावा या देखाव्यात मातृत्व व बाल आरोग्य, महात्मा फुले जनआरोग्य योजना, क्षयरोग मुक्त भारत अभियान, राष्ट्रीय आरोग्य अभियान, एनसीडी विभाग, आयुष्मान आरोग्य मंदिर, व्यसनमुक्ती अभियान, मानसिक आरोग्य सेवा, रक्तदान व अवयवदान जनजागृती, स्वच्छता व आरोग्य, एकात्मिक सल्ला व समुपदेशन केंद्र () आदी योजनांची माहिती देण्यात आली आहे. रुग्णालयातील उपलब्ध सेवांचे सादरीकरण ग्रामीण रुग्णालयात उपलब्ध असलेल्या अत्यावश्यक सेवांवरही विशेष भर देण्यात आला आहे. यात १०२ व १०८ आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा गर्भवती मातांसाठी दर मंगळवारी तपासणी आवश्यक गर्भवती महिलांसाठी सोनोग्राफी सेवा बालकांचे नियमित लसीकरण नेत्र तपासणी विभाग मानसिक आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार क्षयरोग निदान सेवा डिजिटल एक्स-रे व ऑनलाईन रिपोर्ट सेवा रक्त व लघवीच्या ७६ प्रकारच्या मोफत तपासण्या जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी सेवा सुमारे २७४ प्रकारच्या औषधांचे मोफत वितरण आंतररुग्ण व प्रसूती मातांसाठी सकस आहार व्यवस्था यांची माहिती चित्ररूपाने आणि माहिती फलकांच्या माध्यमातून सादर करण्यात आली आहे. 'आम्ही आरोग्य सेवेचे सेवेकरी'चा संदेश या देखाव्याचा मुख्य उद्देश नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती करणे आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सेवांबाबत विश्वास निर्माण करणे हा आहे. ''आम्ही आरोग्य सेवेचे सेवेकरी'' हा संदेश संपूर्ण देखाव्यातून प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आला आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक जनजागृती यांचा सुंदर संगम घडवून आणणारा हा देखावा ग्रामीण रुग्णालय, मानवतच्या आरोग्य कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी व प्रशासनाच्या सेवाभावी कार्याचा जणू आरसा ठरत आहे. नागरिकांकडून या उपक्रमाचे कौतुक होत असून राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा देखावा महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

# सेलूत २१ ते २४ सप्टेंबरदरम्यान गणेशोत्सव व्याख्यानमाला : ६५ वे वर्ष; ज्ञान-विज्ञान, सामाजिक प्रश्न, आरोग्य व संगीताची मेजवानी

**सेलू,/प्रतिनिधी-** गणेशोत्सवाच्या माध्यमातून ज्ञान-विज्ञान, मनोरंजन तसेच ज्वलंत सामाजिक प्रश्नांवर प्रबोधन व्हावे, या उद्देशाने सेलू येथे २१ ते २४ सप्टेंबरदरम्यान ६५ व्या गणेशोत्सव व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. नूतन विद्यालयातील कै. राजेंद्र बन्सीलालजी गिल्डा सभागृहात दररोज सायंकाळी ६ वाजता हे कार्यक्रम होणार आहेत.

सोमवार, २१ सप्टेंबर रोजी 'पद्मश्री नारायण सुर्वे : आधुनिक साहित्यातले कबीर' या विषयावर प्रा. डॉ. विश्वाधार देशमुख (नांदेड) यांचे व्याख्यान होणार आहे. प्रा. डॉ. राजाराम अध्यक्षस्थानी राहणार असून, प्रा. डॉ. अशोक पाठक, भगवान देवकते आणि मोहन खापरखुंटीकर संयोजन करणार आहेत. तर मंगळवार २२ सप्टेंबर रोजी 'आजच्या मुलांची बदलती मानसिकता' या विषयावर परिसंवाद होणार आहे. यामध्ये डॉ. सुबोध माकोडे, महिला पोलीस अस्मिता मोरे, शिक्षक शशिकांत देशपांडे, आजोबांच्या भूमिकेतून रामकिशन (आबा) सोळंके, समुपदेशक प्रवीण सोनोने तसेच विद्यार्थी प्रतिनिधी जय विजय चौधरी आणि सान्वी बाबासाहेब हेलसकर सहभागी होणार आहेत. व्हिजन इंग्लिश स्कूलचे अध्यक्षीय संचालक संतोष कुलकर्णी अध्यक्षस्थानी राहतील. ॲड. पौर्णिमा जोहिरे, प्रणिता सोलापुरे आणि संध्या फुलपगार संयोजन करणार आहेत.

बुधवार २३ सप्टेंबर रोजी 'श्वासाचे महत्त्व आणि ओंकार' या विषयावर डॉ. चारुशिला जवादे (परभणी) यांचे व्याख्यान होणार आहे. योगशिक्षक डी. डी. सोन्नेकर अध्यक्षस्थानी राहतील. रवी कुलकर्णी, रवी मुळावेकर आणि कैलास कदम संयोजन करणार आहेत. तसेच गुरुवार, २४ सप्टेंबर रोजी स्थानिक कलाकारांचा 'आशा-सुमन (स्वरांजली)' हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. माजी आमदार हरिभाऊ लहाने अध्यक्षस्थानी राहणार असून, नगराध्यक्ष मिलिंद सावंत, साईबाबा बँकेचे अध्यक्ष हेमंतराव आडळकर, उपनगराध्यक्ष साईराज बोराडे, माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे, माजी जिल्हा परिषद सभापती अशोक काकडे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष राजेंद्र लहाने आणि नगरपरिषद सदस्य प्रभाकर सुरवसे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या संगीत मैफलीत हेमलता देशमुख, अलका पांडे, रमा बाहेती, प्रीती राठी, प्रीती सराफ, मनीषा पांडे, शिल्पा दीक्षित, पद्मजा खारकर, सुषमा दामा, सीमा सुक्ते, मंजुषा बोराडे, वैष्णवी शिवणकर, स्वाती तांबे, साक्षी गोसावी आणि रसिका दायमा या गायिका आशा भोसले आणि सुमन कल्याणपूर यांच्या गाजलेल्या गीतांचे सादरीकरण करणार आहेत. कार्यक्रमाचे संयोजन मोहन बोराडे, सच्चिदानंद डाखोरे आणि पूजा तोडकर-महाजन करणार असून, ध्वनी संयोजन गंगाधर कान्हेकर यांचे आहे.

व्याख्यानमालेतील सर्व कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन व्याख्यानमालेचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक के. के. देशपांडे, चिटणीस अजित मंडलिक, समन्वयक डॉ. काशिनाथ पल्लेवाड आणि कार्यकारिणी मंडळाने केले आहे. आयोजनासाठी कार्याध्यक्ष चंद्रशेखर मुळावेकर, राजेश ठेंगे, लत गिल्डा, कोषाध्यक्ष उज्ज्वला सतीश भाला, उपाध्यक्ष संजय विटेकर, किशोर जोशी, प्रा. ए. डी. कुलकर्णी, डॉ. ऋतुराज साडेगावकर, बाबासाहेब हेलसकर, चंद्रशेखर नावाडे, बाबासाहेब चारठाणकर, शोभा कोरडे, जयश्री सोन्नेकर, डॉ. सुरेश हिवाळे, कल्याण पवार, डॉ. शरद ठाकर, प्रा. प्रभाकर रावते, अविनाश बिहाणी, उपेंद्र बेल्लूरकर, प्रा. नागेश कान्हेकर, संजय वाघ, बी. टी. गजमल, शोभा ढवळे, सुधाकर नरळदकर, महंम्मद इलियास, संतोष खाडप, डॉ. राजेंद्र मुळावेकर आणि डॉ. विलास मोरे यांच्यासह सहचिटणीस, कार्यकारिणी सदस्य व पदाधिकारी परिश्रम घेत आहेत..

# शेतकऱ्यांनी निराश होऊ नये, सरकार शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करणार

## पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी केली मन्नास पिंप्री येथील पिकांची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ सप्टेंबर**

हिंगोली जिल्ह्यात पावसाने मोठा खंड दिल्यामुळे शेतातील सोयाबीन, कापूस व इतर खरीपांची पिके वाळली आहे. जिल्ह्यात भीषण दुष्काळ जाणवत आहे. परंतु शेतकऱ्यांनी निराश होऊ नये, सरकार शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करणार असल्याची ग्वाही पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी शेतकऱ्यांना दिली.

जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी बुधवारी जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील मन्नास पिंप्री, नागासिनगी या गावातील शेतांची पाहणी केली. यावेळी अलनीनो मुळे राज्यात सर्वत्र त्याचा परिणाम जाणवत आहे. हिंगोली जिल्ह्यात मागील एक ते दीड महिन्यापासून पावसाने खंड दिल्यामुळे तसेच कडक उन्हामुळे शेतातील हातातोंडाशी आलेले सोयाबीन, कापूस व इतर पिके जागेवरच करपली आहेत. मागील एक ते दीड महिन्यापासून पाऊस नसल्यामुळे उत्पादनात मोठी घट होणार आहे. जिल्ह्यात सर्वत्र दुष्काळ सदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकरी हवालदील झाला असून वर्षभर कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावा, बँकेचे कर्ज, खाजगी कर्ज कसे फेडावे याच विवंचनेत आहे. यावर्षी पावसाअभावी खरीपांची पिके हातून जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे आता शेतकरी सरकारच्या मदतीकडे लक्ष लावून बसला आहे. बुधवारी पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील मन्नास पिंप्रीसह इतर भागात पिकांची पाहणी केली.

यावेळी शेतकऱ्यांनी व्यथा मांडतांना हातातोंडाशी आलेले सोयाबीन, कापूस व इतर पिके डोळ्यासमोर करपली असून आता कर्ज कसे फेडावे असा सवाल केला. आता आम्हा जगायचे कसे, कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा असे प्रश्न उपस्थित करीत शासनाने तत्काळ आर्थिक मदत देऊन शेतकऱ्यांना दिलासा दिल्याशिवाय गत्यंतर नाही, अशी मागणी केली.

यावेळी पालकमंत्री यांनीही दुष्काळ सदृश परिस्थिती निर्माण झाल्याचे मान्य करीत महायुती सरकार या संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी असून शेतकऱ्यांनी निराश होऊ नये, सरकार दुष्काळजन्य परिस्थितीवर लक्ष ठेवून असून युध्दस्तरावर सर्वतोपरी मदत करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. यासाठी केंद्र सरकारकडूनही मदत मागितली जाणार आहे. लवकरच कृषी विभागाच्यावतीने सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना योग्य मोबदला दिला जाईल. सरकार शेतकऱ्यांच्या खंबीरपणे पाठीशी उभी असल्याची ग्वाही यावेळी पालकमंत्री झिरवाळ यांनी दिली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, कृषी विभागाचे अधिकारी, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, जिल्हाध्यक्ष अनिल पतंगे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# तातडीने कृषी अहवाल सादर करा जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ सप्टेंबर**

जिल्ह्यातील पावसाचा खंड आणि त्याचा खरीप पिकांवर झालेला परिणाम लक्षात घेता कृषी विभागाने पिकांचे प्रत्यक्ष क्षेत्रीय सर्वेक्षण करून त्याचा सविस्तर व वस्तुनिष्ठ असा तालुका, पीकनिहाय अहवाल तत्काळ सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समितीचे अध्यक्ष राहुल गुप्ता यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समितीची बैठक झाली. बैठकीत जिल्ह्यातील पर्जन्यमान, पावसातील खंड, खरीप पिकांची सद्य:स्थिती तसेच दुष्काळाच्या अनुषंगाने आवश्यक बाबींचा जिल्हाधिकारी यांनी आढावा घेतला. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुधीर ठोंबरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे, जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉ. बी. एन. संगनवार, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ.शिवाजी बुचाले, जिल्ह्याचे सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांची उपस्थिती होती. जिल्ह्याचे जून ते सप्टेंबर कालावधीतील सरासरी पर्जन्यमान ७९५.३ मि.मी. आहे. १३ सप्टेंबरअखेर ५०१.५ मि.मी. पाऊस झाला आहे. हा पाऊस सरासरीच्या ६३.१ टक्के आहे. ऑगस्टमध्ये सरासरीच्या केवळ ३०.२ टक्के पाऊस झाला आहे. या कालावधीत १४ ते १८ दिवसांचा पावसाचा खंड नोंदविण्यात आला आहे. सप्टेंबरमध्येही आतापर्यंत केवळ १७.५ मि.मी. पाऊस झाला आहे. या पर्जन्यमानाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या निकषानुसार आवश्यक त्या उपाययोजनेसाठी सर्व विभागांनी समन्वय ठेवावा. कृषी विभागासह वरिष्ठ भूवैज्ञानिक, पशुसंवर्धन विभागाने समन्वय ठेवत आवश्यक ती कार्यवाही तत्काळ पार पाडावी, असेही निर्देश जिल्हाधिकारी गुप्ता यांनी अधिकाऱ्यांना दिले.

# शेतकऱ्यांचे पशुधन चोरणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ सप्टेंबर**

वापटी शिवारातील पत्राच्या शेडमध्ये बांधून ठेवलेल्या ९ शेळ्या अज्ञात इसमाने चोरून नेल्याची घटना घडली होती. याप्रकरणी सुरेश काळे यांच्या फिर्यादीवरून कुरूंदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा यांनी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविला. स्थानिक गुन्हे शाखेने मोठ्या शिताफीने गुन्ह्याचा तपास करीत शेतकऱ्यांचे पशुधन चोरणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद केली असून आरोपीकडून ७ लाख ९२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार कुरूंदा पोलिस ठाण्यांतर्गत वापटी शिवारातील एका शेडमध्ये बांधलेल्या ९ शेळ्या अज्ञात इसमाने चोरून नेल्या होत्या. या प्रकरणी कुरूंदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने गुन्ह्याच्या अनुषंगाने सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये पोलिस पथकाला संशयीत कार वारंवार बाळापूर, कळमनुरी परिसरात फिरत असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार गुप्त माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे सापळा रचून संशयीत वाहन ताब्यात घेतले. त्यानंतर चालकाला गुन्ह्यांसंदर्भाने विचारपूर केली परंतु सुरूवातील चालकाने दिशाभूल करणारी माहीती दिली. मात्र पोलिसांनी कसून चौकशी केली असता त्याने त्याचे नाव मोहम्मद सलमान सिद्दीकी वय ३२ रा तपोवली, ह.मु. बुननूर नगर नांदेड असे सांगितले. पुढील चौकशीत आरोपीने साथीदारांसह हिंगोली जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीत शेळ्या चोरीचे ७ गुन्हे केल्याची कबुली दिली. गुन्ह्यातील १ लाख ९२ हजारांचा मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेली कार अंदाजे किंमत ६ लाख असा एकुण ७ लाख ९२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरील कामगिरी पोलिस अधीक्षक डॉ श्रेणीक लोढा, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि मोहन भोसले, सपोनि वसंत अरसेवार, उपनि माधव जिव्हारे, भुजंग काकरे, किशोर सावंत, मुनीर मुन्नीवाले, दत्ता नागरे, आजम प्यारेवाले, विशाल खंडागळे, प्रदीप झुंगरे, मारूती काकडे, पठाण, गुंजकर, हराळ यांनी केली आहे.



हिंगोली- शहरातील देवडा नगर भागातील उद्यानात गुरूवारी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त हुतात्म्यांना अभिवादन करण्यात येणार आहे. पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्याहस्ते हुतात्म्यांना पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात येणार असून नगर पालिकेने जय्यत तयारी केली आहे. छाया- विजय गुंडेकर

## संक्षिप्त वृत्त

### दुष्काळ जाहीर करून मदत द्या- पवन जाधव



हिंगोली-हिंगोली तालुक्यासह जिल्ह्यात माहे जून, जुलै, ऑगस्ट महिन्यात पावसाची मोठ्या प्रमाणात तूट आहे. कमी पावसामुळे खरीप हंगामातील पिकांना मोठा फटका बसला आहे. पाऊस नाही दुसरीकडे उन्हाळ्यासारख कडक उन पडत, यामुळे पिके करपून जात आहे. यामुळे शासनाने तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करावा व शेतकऱ्यांना ५० हजार हेक्टरी अनुदान द्यावे व दुष्काळी योजना जाहीर कराव्यात अशी मागणी लासिना येथील सामाजिक कार्यकर्ते पवन जाधव पाटील यांनी केली आहे. एकीकडे पाऊस नाही दुसरीकडे उन्हाळ्यासारख कडक उन यामुळे पिके करपून जात आहे डोळ्यासमोर पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करावा व ५० हजार हेक्टरी मदत द्यावी अशी मागणी लासीना येथील सामाजिक कार्यकर्ते पवन जाधव पाटील यांनी केली आहे. तसेच पिक विमा कंपन्यांच्या मोबदला सरसकट शेतकऱ्यांना दिला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

### सिध्दीविनायक गणेश मंडळाच्यावतीने कार्यक्रम



हिंगोली- गणेश उत्सवानिमित्त यंदा प्रथमच श्री सिद्धीविनायक सार्वजनिक बाल गणेश मंडळ, छत्रपती शिवाजी राजे उद्यान परिसर एन.टी.सी. हिंगोली यांच्या वतीने विविध कार्यक्रम, स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री सिद्धीविनायक सार्वजनिक बाल गणेश मंडळ, छत्रपती शिवाजी राजे उद्यान परिसर एन.टी.सी. हिंगोली यांच्या वतीने प्रथमच दि.१४ ते २५ सप्टेंबर या कालावधीत विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सवानिमित्त आयोजित विविध स्पर्धा, कार्यक्रम व उपक्रमात मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन श्री सिद्धिविनायक सार्वजनिक बाल गणेश मंडळ, एन.टी.सी. हिंगोली यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### पावसाळ्यातही उन्हाची तीव्रता

हिंगोली- मागील दिड महिन्यापासून पावसाने खंड दिल्यामुळे जिल्ह्यात अत्यंत भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. दुष्काळसदृश परिस्थितीमुळे एकीकडे शेतकरी संकटात सापडला असतांना दुसरीकडे दिवसभर उन्हाचा कडाका नागरिकांना सहन करावा लागत आहे. दुपारच्या सुमारास उन्हाळा ऋतुप्रमाणे उन्हाचे चटके बसत आहेत. अनेक ठिकाणी पाण्याचे स्त्रोत आटत असून विहीर, बोअरचे पाणी आटत असल्यामुळे पाणीटंचाईचे संकट येत्या काही दिवसातच येण्याची शक्यता आहे.

# कुणबी जात प्रमाणपत्रासाठी शिबीरांचे आयोजन कागदपत्रे, वंशावळ संदर्भात मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १६ सप्टेंबर**

हिंगोली जिल्ह्यातील पात्र नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य मिळावे. यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील मंडळ स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १४ सप्टेंबर रोजी कळमनुरी तालुक्यातील वारंगा फाटा, सेनगाव तालुक्यातील पुसेगाव, हिंगोली तालुक्यातील खानापूर ची. येथे शिबिर आयोजित केले होते. आयोजित केलेल्या शिबिरामध्ये ६ अर्ज प्राप्त झाले असून ०४ अर्ज मान्य केले आहेत.

उद्या १६ सप्टेंबर २०२६ रोजी शिरडशहापूर, आ. बाळापूर, साळवा, टेभूर्णी, गिरगाव, हत्ता, साखरा, बाभूळगाव, हिंगोली शहर व ग्रामीण येथे आयोजित केले होते.

या शिबिरांमध्ये कुणबी जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे, जुन्या महसुली अभिलेखांमधील नोंदी, वंशावळ तयार करण्याची पद्धत, उपलब्ध पुराव्यांचे महत्त्व तसेच जात प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याची कार्यपद्धती याबाबत नागरिकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले तसेच नागरिकांना त्यांच्या उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी करून घेण्यासाठी व कुणबी जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक कार्यवाहीबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्याकडे उपलब्ध असलेले जुने महसुली अभिलेख, शैक्षणिक अभिलेख, जन्म-मृत्यू नोंदी, कुटुंबातील पूर्वजांच्या जात नोंदी, वंशावळीसंबंधी कागदपत्रे व इतर उपलब्ध पुरावे घेऊन संबंधित मंडळ स्तरावरील शिबिरास उपस्थित राहावे. हिंगोली जिल्ह्यातील महसूल मंडळनिहाय शिबिरांचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले असून संबंधित मंडळातील नागरिकांनी आपल्या मंडळासाठी निश्चित केलेल्या दिनांक व वेळेनुसार शिबिराचा लाभ घ्यावा.

# आदर्शमध्ये भित्तीपत्रकांचे विमोचन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ सप्टेंबर**

पर्यावरण संवर्धन आणि प्रदूषणमुक्त भविष्यासाठी हरित रसायनशास्त्राचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या उद्देशाने आदर्श एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागातर्फे ग्रीन केमिस्ट्री या भित्तीपत्रकाचे विमोचन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ.विलास आघाव यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रो. डॉ.संजीव कुमार नरवाडे , प्रा. डी. आर .पवार, रसायनशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. शैला वाघ, डॉ.अविनाश पावडे ,प्रा. अमजदखान पठाण उपस्थित होते. भित्तीपत्रकाचे सादरीकरण करताना कु. श्रेया बैरागी आणि पूनम कंठेवाड यांनी रसायनशास्त्रातील पर्यावरणपूरक प्रक्रिया, प्रदूषण कमी करण्याचे उपाय, ऊर्जा बचत, कचरा निर्मिती कमी करणे तसेच नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर याबाबत माहिती दिली. याप्रसंगी प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांनी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी रसायनशास्त्राचा जबाबदारीने वापर करणे आवश्यक असल्याचे आपल्या मार्गदर्शनातून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अश्विनी कांबळे तर आभार प्रदर्शन कु. शुभांगी गिरगावकर हिने केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी कष्ट घेतले तसेच श्री संतोष लोणकर आणि श्री रामसिंग पवार यांचे सहकार्य लाभले .या प्रसंगी रसायनशास्त्र विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दराडे विद्यालयात श्री चक्रधर स्वामी अवतार दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ सप्टेंबर**

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालयात भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचा अवतार दिन अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. प्रकाश अंभोरे, संगीता जाधव आणि मंजुषा पानपट्टे यांच्या हस्ते भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर उपमुख्याध्यापक अनिल लोळेवार, नागनाथ सोळंके यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते.

याप्रसंगी संगीता जाधव यांनी भगवान श्री चक्रधर स्वामी यांचे जीवनचरित्र, तत्त्वज्ञान, समाजसुधारणेचे कार्य आणि मानवतावादी विचार यांविषयी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. श्री चक्रधर स्वामी हे महान समाजसुधारक, तत्त्वज्ञ आणि महानुभाव पंथाचे प्रवर्तक होते. त्यांनी तत्कालीन समाजाला सत्य, अहिंसा, मानवता, समानता, सदाचार आणि ईश्वरभक्तीचा संदेश दिला. समाजातील जातिभेद, स्त्री-पुरुष विषमता, कर्मकांड, अंधश्रद्धा तसेच उच्च-नीचतेच्या कल्पनांना त्यांनी ठाम विरोध केला, असे श्रीमती जाधव यांनी सांगितले. कार्यक्रमाला विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बेलमंडळ ते येळेगाव तुकाराम दुपदरी रस्त्याचे काम सुरू करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ सप्टेंबर**




कळमनुरी तालुक्यातील बेलमंडळ ते येळेगाव तुकाराम या रस्त्याचे दुपदरीकरणाचे काम बंद असल्यामुळे शेतकरी, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. सदरील काम तत्काळ सुरू करण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, बेलमंडळ ते येळेगाव तुकाराम या दुपदरी रस्त्याच्या कामासाठी दोनवेळा निवेदने दिली परंतु यासंदर्भात प्रशासनाने कोणतीही ठोस कार्यवाही केली नाही. रस्त्याचे काम बंद असल्यामुळे बेलमंडळ व परिसरातील शेतकरी, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या दळवणवळणाचा मार्ग बंद झाला आहे. प्रशासकीय व कायदेशीर अडथळा दूर करून या रस्त्याचे काम तत्काळ सुरू करावे अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर रामराव मुधोळ, गजानन मुधोळ, विठ्ठल मुधोळ, सुधाकर मुधोळ, नामदेव मुधोळ, सुनील शिंदे, गणपत मुधोळ, कुंडलीक मुधोळ, गणेश मुधोळ आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# 'एडीबी'च्या अर्थसाहाय्याने ५०० खाटांचे जिल्हा सामान्य रुग्णालय उभारण्यास मंजुरी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ सप्टेंबर -**

राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'प्रगती' प्रकल्पाअंतर्गत नांदेड येथे आशियाई विकास बँकेच्या (एडीबी) अर्थसाहाय्यातून ५०० खाटांचे नवीन जिल्हा सामान्य रुग्णालय उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी मागील दोन वर्षांपासून या मंजुरीसाठी सातत्याने पाठपुरावा केला होता.

मंगळवारी याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला असून, नागरिकांना स्थानिक पातळीवर दर्जेदार व मोफत उपचार उपलब्ध करून देणे, हा या ५०० खाटांच्या रुग्णालयाच्या उभारणीचा मुख्य उद्देश आहे. या रुग्णालयाच्या प्रभावी संचालनासाठी मंजूर आकृतीबंधानुसार सर्व ५९४ पदे नव्याने निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आली असून, या नवनिर्मित पदांच्या वेतनासाठी ३१.२५ कोटी रुपयांचा अपेक्षित खर्च मंजूर करण्यात आला आहे.

याच शासन निर्णयान्वये राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवांचे जाळे बळकट करण्यासाठी आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने ४ हजार २५० कोटी रुपये खर्चाचा 'प्रगती' प्रकल्प राबविला जाणार असून, यामध्ये ७० टक्के 'एडीबी'चे कर्ज आणि ३० टक्के राज्य शासनाचे योगदान असणार आहे. या निधीपैकी १ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी प्रकल्पाअंतर्गत मंजूर आरोग्य संस्थांच्या पायाभूत सुविधा आणि सक्षमीकरणासाठी वापरला जाणार आहे.

### राज्य सरकारचा मोठा निर्णय; खा. अशोक चव्हाण यांच्या पाठपुराव्याला यश

माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या पुढाकारातून नांदेड येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून ते ५०० खाटांचे करण्याचा शासन निर्णय यापूर्वीच जारी झाला होता. या प्रकल्पासाठी निधीही उपलब्ध करून द्यावा, यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीने प्रसिद्ध केलेल्या 'विकसित नांदेडचा संकल्पनामा' या घोषणापत्रातही या रुग्णालयाच्या उभारणीचे आश्वासन देण्यात आले होते.

दरम्यान, भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आ. श्रीजया चव्हाण यांनी १७ मार्च २०२६ रोजी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडून ५०० खाटांच्या नवीन जिल्हा सामान्य रुग्णालयाला आशियाई विकास बँकेच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी केली होती. त्या लक्षवेधीला उत्तर देताना सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी 'एडीबी'अंतर्गत कामांच्या पुढील प्रस्तावात या रुग्णालयाच्या उभारणीचा समावेश केला जाईल, असे जाहीर केले होते.

नांदेड जिल्ह्याच्या आरोग्य सेवेच्या बळकटीकरणासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या या निर्णयाबद्दल खा. अशोकराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्राताई पवार आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांचे आभार मानले आहेत. ही मान्यता मिळवण्यासाठी भाजपा-महायुतीतील सहकाऱ्यांचे मोठे योगदान लाभल्याचेही त्यांनी आपल्या प्रतिक्रियेत म्हटले आहे.

# नरसीच्या महेबुब नगरात 'एकदंत गणेश मंडळा'चा भक्तिमय जयघोष

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १६ सप्टेंबर -**



तालुक्यातील नरसी येथील महेबुब नगरात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सर्व समाजातील तरुण बांधवां नी एकत्र येत 'एकदंत गणेश मंडळा'ची स्थापना केली असून, गणेशोत्सवाचा शुभारंभ मोठ्या भक्तिभावाने व उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला.

यंदाच्या वर्षी समाजातील सर्व तरुणांनी एकत्र येऊन साजरा केलेला हा गणेशोत्सव सामाजिक एकोपा आणि बंधुभावाचे सुंदर दर्शन घडविणारा ठरला.

दि.१५ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ठीक ७ वाजता गणेशोत्सवाच्या प्रथम दिनी गणरायाची विधिवत पूजा व महाआरती करण्यात आली. रामलिंग आप्पा मठपती यांच्या मुखोद्गत मंत्रोच्चारात धार्मिक विधी पार पडले. यावेळी भाजपाचे माजी जिल्हा सरचिटणीस तथा श्री तुळजा भवानी जिनिंग फ्रेड्रेशनचे चेअरमन श्रावण भिलवंडे यांच्या हस्ते श्री गणरायाची विधिवत पूजा व आरती करण्यात आली.

'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने महेबुब नगराचा परिसर दुमदुमून गेला असताना, उपस्थित भाविकांनी भक्तिभावाने गणरायाचे दर्शन घेत महाआरतीमध्ये सहभाग नोंदविला. गणरायाच्या आगमनाने महेबुब नगरातील वातावरण भक्तिमय झाले असून, पुढील दिवसांतही विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

या प्रथम पूजा व आरती सोहळ्यास श्री तुळजा भवानी जिनिंग फेडरेशनचे चेअरमन श्रावण भिलवंडे, पोलीस पाटील इब्राहिम बेग पटेल, होटाळा नगरीचे माजी सरपंच दत्तात्रय पाटील होटाळकर, जी. व्ही. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नंदकिशोर टोकलवाड, उद्योजक साईनाथ आकमवाड, लाभषटवार सावकार, सय्यद इस्माईल साहेब, दैनिक तरुण भारतचे प्रतिनिधी आनंद राव सूर्यवंशी, गंगाधर गंगासागरे, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य मारुती बुके, पत्रकार माधव बैलकवाड, दिगंबर भिलवंडे, विनोद भिलवंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी एकदंत गणेश मंडळाच्या वतीने उपस्थित प्रतिष्ठित मान्यवरांचे शाल व श्रीफळ पुष्पहार घालून यथोचित सत्कार करण्यात आला. गणेशोत्सवाच्या निमित्ताने सर्व समाजातील नागरिकांनी एकत्र येत दिलेला सामाजिक सलोखा, परस्पर बंधुभाव आणि एकतेचा संदेश उपस्थितांच्या मनाला भावला.

दरम्यान, गणरायाच्या भक्तांसाठी गोविंद टोकलवाड यांच्या वतीने भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. महाप्रसादाचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आले.

'एकदंत'च्या चरणी भक्ती, मनामनात एकता आणि ओठांवर गणरायाचा जयघोष-अशा मंगलमय वातावरणात नरसीच्या महेबुब नगरातील गणेशोत्सवाला सुरुवात झाली आहे. श्री गणरायाच्या आगमनाने परिसरात चैतन्य निर्माण झाले असून, 'विघ्नहर्ता गणराया' सर्वांच्या जीवनातील संकटे दूर करून सुख, शांती, समृद्धी आणि आरोग्य प्रदान करो, अशी भावना यावेळी उपस्थित भाविकांनी व्यक्त केली.

## नगरपंचायतच्या वतीने एकल महिलांच्या नोंदणीस सुरुवात

**हिमायतनगर** -हिमायतनगर नगरपंचायतीच्या वतीने एकल महिला सर्वेक्षण व नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या सर्वेक्षणात विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता तसेच अविवाहित महिलांचा समावेश करण्यात आला असून, पात्र महिलांनी विहित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह आपला अर्ज नगरपंचायत कार्यालयात जमा करावा, असे आवाहन मुख्याधिकारी समाधान मिसाळ व नगराध्यक्ष शेख रफिक शेख महबूब, राहुल बोकारे यांनी केले आहे.



महाराष्ट्र शासनाच्या प्रशासन संचालनालयाच्या वतीने राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रातील एकल महिलांची माहिती संकलित करून त्यांची नोंदणी अद्ययावत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुसार हिमायतनगर नगरपंचायतीच्या (ऊाधड) विभागात एकल महिलांसाठी मदत कक्ष सुरू करण्यात आला आहे. सर्वेक्षण अर्ज भरण्यासाठी तसेच आवश्यक माहिती मिळविण्यासाठी संबंधित महिलांनी नगरपंचायत कार्यालयाशी संपर्क साधावा असे आव्हान प्रशासनाने केले आहे. हिमायतनगर नगरपंचायत वतीने पात्र एकल महिलांनी २५/९/ २०२६ पर्यंत आपले अर्ज व आवश्यक कागदपत्रे कार्यालयीन वेळेत नगरपंचायत कार्यालयात जमा करावीत शासनाच्या निर्दे शानुसार एकल महिलांची माहिती संकलित करून त्याची नोंदणी करण्यात येणार आहे. या प्रक्रियेमुळे संबंधित महिलांची अधिकृत माहिती प्रशासनाकडे उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. दरम्यान, सर्वेक्षणासाठी महिलांनी कोणती कागदपत्रे सादर करावीत, अर्ज कसा भरावा किंवा इतर आवश्यक माहितीसाठी नगरपंचायत कार्यालयातील (ऊाधड) मदत कक्षाशी संपर्क साधावा, असे आव्हान नगरपंचायत प्रशासनाने केले आहे.

## महाकाल गणेश मंडळ येथे रुग्णांच्या विविध तपासण्या

**नवीन नांदेड-** मातृसेवा आरोग्य केंद्र सिडकोच्या वतीने परिसरातील महाकाल गणेश मंडळ येथे आरोग्य शिबिर घेऊन रुग्णावर औषधोपचार करून रक्ताच्या विविध तपासण्या करण्यात आल्या यावेळी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष शिंदे व प्रभागाचे नगरसेवक सौ सुवर्णा बसवते यांच्या उपस्थित आरोग्य शिबिरास प्रारंभ करण्यात आला. शहरी आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान मुंबई यांच्या पत्रान्वये मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून गणेशोत्सवाच्या कालावधीत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये श्री गणेशा आरोग्य अभियान २०२६ अंतर्गत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. वरील विषयान्वये मुख्यमंत्री सचिवालयाच्या आधिनस्त राहुल मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व धर्मदाय रुग्णालय कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सवात ठिकठिकाणीच्या गणेश मंडळ परिसरात आरोग्य शिबिर ठेवण्याचे आदेशानुसार दिनांक १६ सप्टेंबर रोजी सिडको येथील महाकाल गणेश मंडळ वसंतराव नाईक कॉलेज समोर सिडको येथे श्री गणेशा आरोग्य अभियान अंतर्गत शिबिर घेण्यात आले. या शिबिरात शेकडो रुग्णाची तपासणी करून औषधोपचार, रक्तदाब व रक्तांच्या विविध तपासण्या करण्यात आल्या. यावेळी मातृसेवा आरोग्य केंद्राची वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष शिंदे यांनी रुग्णांची तपासणी केली. याबरोबरच इतर तपासण्या करण्यासाठी परिचारिका प्रियंका रच्चेवार , रेखा चौदंते ,जयश्री दरेगावे यांच्यासह आरोग्य कर्मचारी गलपवाड, सुखदेव जोंधळे, ओम सूर्यवंशी यांच्यासह आशा वर्कर यांनी हे शिबिर यशस्वीरित्यापार पाडण्यासाठी परिश्रम घेतले. तसेच सदरील आरोग्य शिबिर पार पाडण्यासाठी महाकाल गणेश मंडळाचे अध्यक्ष नितीन पवळे, उपाध्यक्ष कृष्णा टोरलुडवार यांनी सहकार्य केले.

## मराठवाडा मुक्तिदिनानिमित्त 'देशभक्ती गीतांची मैफल'

**नांदेड** -नांदेड : मराठवाडा मुक्तिदिनाच्या ऐतिहासिक स्मृतींना उजाळा देत देशभक्तीपर गीतांच्या माध्यमातून राष्ट्रप्रेमाची भावना जागविण्यासाठी 'देशभक्ती गीतांची मैफल' या विशेष संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांच्या वर्षभरातील ९१व्या उपक्रमांतर्गत विजय निलंगेकर यांच्या कुमार सानू म्युझिकल ग्रुप प्रस्तुत हा कार्यक्रम गुरुवार, १७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता तिरंगा झेंडा पॉलिटेक्निक कॉलेज, विसावा गार्डनसमोर, नांदेड येथे होणार आहे. या कार्यक्रमास नांदेडकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन दिलीप ठाकूर व सुरेश लोट यांनी केले आहे. कुमार सानू म्युझिकल ग्रुपच्या कलाकारांकडून देशभक्तीपर तसेच लोकप्रिय गीतांचे सादरीकरण करण्यात येणार असल्याने संगीतप्रेमींसाठी ही मैफल विशेष आकर्षण ठरणार आहे. कार्यक्रमात विजय निलंगेकर,सुवर्ण जोंधळे, सुजाता खाडे, अलीम भाई, रवी गोयल, मंगेश क्षीरसागर, अंकुश चित्ते, आणि हिना गोंदेकर यांच्यासह कलाकार सहभागी होणार आहेत. मराठवाडा मुक्तिदिनाच्या निमित्ताने आयोजित या देशभक्तीपर संगीत मैफलीत नागरिकांनी, युवकांनी, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजक धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर व सुरेश लोट यांनी केले आहे.

# न्यायालयीन कर्मचाऱ्यांकडून शासनाचा निषेध

**भा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ सप्टेंबर -**

उच्च न्यायालयातील कर्मचा-यांप्रमाणे वेतनश्रेणी लागु व्हावी या प्रमुख मागणीसाठी बुधवारी नांदेड जिल्हयातील सर्व न्यायालयांमध्ये कर्मचा-यांनी मोठया संख्यने हजेरी लावत काळी फित लावून शांततामय मार्गाने निषेध नोंदवत शासनाचे लक्ष वेधले.

महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाने यापुर्वीच आंदोलनाची इशारा वजा नोटीस शासनास दिली असून त्याची अंमलबजावणी म्हणुन बुधवार दिनांक १६ सप्टेंबर रोजी नांदेडसह राज्यातील सर्व न्यायालयीन कर्मचा-यांनी काळ्या फिती लावून शासनाकडून होत असलेल्या दप्तर दिरंगाईचा निषेध नोंदवित आपले दैनंदिन कामकाज शांततेत पार पाडले. विशेष बाब म्हणजे सेवानिवृत्त कर्मचा-यांचीही मोठया संख्येने उपस्थिती होती.

दि.१६ व १७ ऑक्टोबर रोजी काळी फित लावून शासनाचा निषेध नोंदविण्यात येणार असून त्यानंतरही मागणी मान्य न झाल्यास ५ नोव्हेबर रोजी सामुहिक रजा व त्यानंतर १७ नोव्हेबर पासून राज्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर जाणार आहेत.

# अवजड वाहनांच्या रांगेमुळे अपघाताची शक्यता; संबंधित विभागाचे दुर्लक्ष

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १६ सप्टेंबर -**



शहरातील सर्वात मोठ्या शाळांपैकी एक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त असलेली पंचशील माध्यमिक विद्यालय, हदगाव या शाळेत सकाळी विद्यार्थ्यांना जाताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते सार्वजनिक वाचनालय पर्यंत अवैद्यरित्या रस्त्यांवरती लावण्यात आलेल्या वाहनांमुळे व मागणी नसताना विनाकारण विट सप्लायर्सच्या तासनतास उभ्या असलेल्या अवजड वाहनांमुळे विद्यार्थ्यांना आपला जीव मुठीत घेऊन शाळा गाठावी लागत असल्याकारणाने ६० फुटाचा रोड अवघ्या १० फुटावर आल्यामुळे भविष्यात अपघाताची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे या गंभीर घटनेकडे संबंधित विभागाने त्वरित लक्ष देऊन हा रस्ता विद्यार्थ्यांना जाण्या-येण्याकरिता त्वरित मोकळा करावा अशी मागणी पालक वर्गातून जोर धरत आहे.

हदगाव शहरातील वाढती वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चाललेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते सार्वजनिक वाचनालय पर्यंत प्रतिष्ठान समोर दुचाकी, चारचाकी वाहन रस्त्याच्या कडेला न लावता मनाप्रमाणे वाहने उभी करण्यात येत असतात. यातच भर म्हणजे कोणतीही मागणी नसताना विट सप्लायर चे अवजड वाहने सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत एकाच ठिकाणी उभी असल्यामुळे शाळकरी विद्यार्थ्यांना आपले जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याकारणाने संबंधित विभागाने या गंभीर घटनेकडे त्वरित लक्ष देऊन शाळकरी विद्यार्थ्यांना जाण्या-येण्याकरिता रस्ता पूर्णतः मोकळा ठेवावा अशी मागणी पालक वर्गातून होत आहे.

# किनवटची जात पडताळणी समिती कार्यान्वित करा : आ. केराम

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १६ सप्टेंबर -**

किनवट येथे स्वतंत्र अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी समिती सुरू करण्यास शासनाने मान्यता दिलेली असतानाही ही समिती अद्याप छत्रपती संभाजीनगर येथून कार्यरत असल्याने किनवट, माहूर व परिसरातील आदिवासी नागरिक, विद्यार्थी तसेच शासकीय नोकरीच्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्राच्या कामासाठी वारंवार संभाजीनगरच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. ही गैरसोय तातडीने दूर करून किनवटची जात पडताळणी समिती किनवट येथेच प्रत्यक्ष कार्यान्वित करावी, अशी मागणी आमदार भीमराव केराम यांनी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके तसेच मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



किनवट हा मराठवाड्यातील अतिदुर्गम व आदिवासीबहुल भाग असून, किनवट ते छत्रपती संभाजीनगर हे सुमारे ४०० किलोमीटर अंतर आहे. जात प्रमाणपत्र पडताळणीसारख्या महत्त्वाच्या प्रशासकीय कामासाठी एवढ्या दूरच्या शहरात वारंवार जावे लागत असल्याने आदिवासी विद्यार्थी, पालक व नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम मोठ्या प्रमाणात खर्च होत आहेत.

आदिवासी समाजाच्या सोयीसाठी शासनाने २९ जून २०२२ रोजी किनवट येथे स्वतंत्र अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय सुरू करण्यास मान्यता दिली होती. तसेच शासन पत्र क्र. एसटीसी-२०१२/का-१०/शिकाना, दि. ३० डिसेंबर २०२२ नुसार सदर समितीचे कार्यालय किनवट, जि. नांदेड येथे दि. १५ जानेवारी २०२३ पर्यंत सुरू करण्याबाबत आदेश देण्यात आले होते.मात्र, शासनाच्या मान्यतेनंतरही समितीचे कार्यालय प्रत्यक्षात किनवट येथे कार्यान्वित झालेले नसल्याने या निर्णयाचा मूळ उद्देशच अपूर्ण राहिला आहे.

आदिवासी जनतेच्या हक्काची सेवा त्यांच्या दारापासून दूर जाऊ नये; प्रशासनानेच जनतेच्या जवळ यावे, असा स्पष्ट जनहिताचा आग्रह आ. केराम यांनी धरला आहे.किनवटची समिती किनवटमध्येच सुरू करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही तातडीने पूर्ण करून कालबद्ध पद्धतीने कार्यालय प्रत्यक्ष कार्यान्वित करावे आणि आदिवासी विद्यार्थी व नागरिकांच्या संभाजीनगरच्या फेऱ्या कायमच्या थांबवाव्यात, अशी ठाम मागणी आ. भीमराव केराम यांनी केली आहे.

# मुदखेड तालुक्यातील पार्डी येथील जागृत गणेश मंदिराची अनोखी परंपरा

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १६ सप्टेंबर -**

तालुक्यातील पार्डी (वैजापूर) येथील श्री जागृत गणेश मंदिर संस्थान हे भाविकांचे श्रद्धास्थान असून, या मंदिराची ऐतिहासिक परंपरा आजही जपली जात आहे. येथील गणेशमूर्ती शिवकालीन असल्याचे सांगितले जाते. कै. धोंडोबा रंगाजी भोकरेंच्या पूर्वजांनी मंदिराच्या स्थापनेचा संकल्प करून तब्बल २१ वर्षे या मूर्तीची उपासना केली. त्यानंतर २१ वर्षांनी एका वृक्षातून जागृत श्री गणेशाची मूर्ती प्रकट झाल्याची आख्यायिका आहे.



ही मूर्ती पूर्णपणे लाकडी असून चतुर्भुज स्वरूपाची आहे. मूर्तीच्या डाव्या हातात डमरू, तर एका हातात मोदक असून ती उदरावर बसलेली आहे. मूर्तीची उंची सुमारे ३ ते ३.५ फूट, तर उदराची उंची सुमारे २ फूट आहे. मूर्तीचे मुख उत्तर दिशेस असून, ती उदरावर बसलेली आहे. लाकडी चौरंगावर मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे.

पूर्वीपासून येथे भाद्रपद शुद्ध प्रतिपदेला श्रींचा उत्सव व जयंती उत्सव साजरा करण्याची परंपरा आहे. या निमित्ताने संस्थानात साधू-संतांच्या कीर्तनासह प्रवचनाचे आयोजन केले जाते. उत्सवाच्या दिवशी श्रींची मूर्ती मंदिराबाहेर काढून मंदिराची व मूर्तीची आकर्षक रंगरंगोटी करून सजावट केली जाते. तसेच शाडू मातीच्या गणेशमूर्तीची स्थापना करून दोन्ही मूर्तींची विधिवत पूजा-अर्चा केली जाते.

चतुर्थीपासून पौर्णिमेपर्यंत दररोज रात्री भजन-कीर्तनाचे आयोजन केले जाते. शाळेतील मुला-मुलींसाठी खेळ, रांगोळी तसेच विविध स्पर्धाही घेतल्या जातात. पौर्णिमेच्या रात्री भजन-दिंडी काढण्यात येते. त्यानंतर भाद्रपद शुद्ध प्रतिपदेला श्रींची मूर्ती मंदिराबाहेरील भव्य मंडपात दर्शनासाठी ठेवली जाते. सायंकाळी श्रींच्या समोरील शाडू मातीच्या मूर्तीचे विसर्जन केले जाते. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करून मूळ श्री गणेशमूर्तीची पुन्हा मंदिरात स्थापना केली जाते.

ही धार्मिक परंपरा अनेक वर्षांपासून सुरू असून, परिसरातील भाविक मोठ्या श्रद्धेने उत्सवात सहभागी होतात. श्री जागृत गणेश मंदिरास एकदा अवश्य भेट देऊन श्रींचे दर्शन घेऊन आशीर्वाद घ्यावा, असे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

## पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ सप्टेंबर -**

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त गुरुवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ होणार आहे. माता गुजरीजी विसावा उद्यान नांदेड येथे सकाळी ८.३० वा. हुतात्मा स्मारक स्मृतीस्तंभास मानवंदना व पुष्पचक्र अर्पण केले जाईल. यानंतर सकाळी ९ वा. राष्ट्रध्वज वंदनाचा मुख्य शासकीय समारंभ होईल. या समारंभास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

समारंभासाठी निमंत्रितांनी राष्ट्रीय पोषाखात समारंभ सुरु होण्यापूर्वी २० मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे.

# गणरायाच्या विसर्जनासाठी नदीपात्रात पाण्याची प्रतीक्षा

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. १६ सप्टेंबर -**

गणेश चतुर्थीनिमित्त सोमवार, दि. १४ सप्टेंबर रोजी सर्वत्र श्रीगणेशाचे मोठ्या थाटामाटात व उत्साहात आगमन झाले. घराघरांत गणरायाची प्रतिष्ठापना करून भक्तिमय वातावरणात गणेशोत्सवाला सुरुवात झाली. मात्र, यंदा पावसाने पाठ फिरवल्याने श्रीगणेश विसर्जनाच्या वेळी नदीपात्रातील अत्यल्प पाण्याची स्थिती प्रकर्षाने जाणवत आहे.



मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी परिसरात अनेक भाविकांनी आपल्या घरगुती श्रीगणेशाचे मंगळवारीच एकदिवसीय विसर्जन केले. घरगूती गणेशाचे विसर्जन हे देगलूर रोड, बंधारा परीसरात कून्द्राळा नदीत विसर्जन करण्यात आले.कांही गणेशमूर्तींचे पाच, सात व नऊ दिवसांनी, तर सार्वजनिक गणेश मंडळांच्या श्रीगणेशाचे अकराव्या दिवशी विसर्जन करण्यात येणार आहे. परंपरेनुसार गणेशमूर्तींचे विसर्जन मोठ्या नदी, तलाव अथवा जलाशयात केले जाते. मात्र यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने नदी-नाल्यांमध्ये अपेक्षित पाणीसाठा झालेला नाही.

कून्द्राळा नदीपात्रात श्री गणेशमूर्ती विसर्जित करताना मूर्ती पूर्णपणे पाण्यात बुडेल इतकेही पाणी उपलब्ध नसल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येत आहे. अत्यल्प पाण्यात गणरायाचे विसर्जन करण्याची वेळ भाविकांवर आली आहे. विसर्जनानंतरही श्रीगणेशाची मूर्ती पाण्याच्या वर दिसत असल्याचे हृदयद्रावक चित्र पाहायला मिळत आहे.

**'बाप्पा, वरुणराजाला पावसासाठी साकडे घाल !'**

नदीपात्रातील थोडे फार शिल्लक असलेल्या पाण्यात असलेल्या गणरायाच्या मूर्तीकडे पाहताना भाविकांसह शेतकऱ्यांच्या मनात एकच प्रश्न निर्माण होत आहे. वरुणराजा आता तरी हजेरी लावणार का? गणरायाच्या आगमनानंतर पावसाची बरसात होऊन शेतकऱ्यांवरील संकट दूर व्हावे, अशी अपेक्षा बळीराजा व्यक्त करीत आहे.

खरीप हंगामातील पिकांसाठी यावेळी पावसाची अत्यंत गरज असताना पावसाने दडी मारल्यामुळे शेतकरी चिंतेत आहे. अनेक भागांत पिकांची वाढ खुंटली असून पाण्याअभावी पिके संकटात सापडली आहेत. अशा परिस्थितीत गणरायाच्या विसर्जनाच्या वेळीही नदीपात्रातील पाण्याची दयनीय अवस्था पाहायला मिळत असल्याने यंदाच्या पावसाळ्याची गंभीरता अधोरेखित होत आहे. गणरायाला निरोप देताना 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' असा जयघोष होत असतानाच, बळीराजाच्या मनात मात्र 'बाप्पा, यंदा पाऊस घेऊन ये आणि शेतकऱ्यांचे संकट दूर कर' अशी आर्त हाक उमटताना दिसत आहे. त्यामुळे यंदाचा गणेशोत्सव भक्ती आणि उत्साहाबरोबरच दुष्काळसदृश परिस्थितीची जाणीव करून देणारा ठरत आहे.